ऋषीच्या शापानें तर हे दगड होऊन पडले नसतील ना ? पण शाप देण्या-इतकें त्या ऋषींचें त्यांनीं तरी काय केलें असेल ? मग त्यांनीं त्या ऋषींजवळ कांहींतरी उःशाप मागून घेतला असेलच ! त्या उःशापाचा काल केव्हां येईल तो येवो ! पण सध्यां तरी या गांवाच्या आसपास पुष्कळच दगड आहेत हें खरें !

काळ्या—कभिन्न दगडाप्रमाणें या गांवच्या आजूबाजूस दृष्टि वळवली कीं, सह्याद्रीचे लहानमोठे सैनिक सभोंवार गांवचें रक्षण करण्याकरितां उभे असलेले आपणांस दिसतील. गांवची सीमा अगदीं जंगलाला भिडलेली. आंबा, चिंच, करंज, पिंपळ, वड यांचीं झाडें, मधूनमधून चौकोनी, लांबट आकाराचीं भाताचीं खाचरें पाहिलीं कीं या गांवांतून कधीं कोठें दुसरीकडे जाऊं नये असें वाटतें.

या सर्वांवर ताण करणारें या गांवचें काळ्या कातळांतलें गोड गोड पाणी आणि कोरडी हवा. या दोन कारणांनीं मल्याण गांव लोकांना फार फार आवडतें.

५०, ६० उंबऱ्याचं गांव. गांवांत माळी, मराठा व १०–१२ धनगरांचीं घरं—बहुतेक लोक भातशेतीच्या कामांत गुंतलेले दिसतील. धनगरांचे घोंगड्यांचे ८–१० माग सारखे चाललेले दिसतील.

या गांवचीं घोंगडी कांवळी, प्रसिद्ध आहेत. कांहीं जमीन दुपिकी आहे. भाताचें पीक निघाल्यावर ज्या जमिनींत ओल रहाते अशांत वाल लावण्यांत येतात. येथील कलिंगडें व दवणामरव्याच्या बागा अलिबाग तालुक्यांत प्रसिद्ध आहेत.

या गांवांत आणि आजूबाजूच्या लहान लहान वस्तींत प्रसिद्ध असलेलें एकच दुकान आहे. त्यास त्याच्या मालकाच्या नांवावरून सगळे “ रामू वाण्याचें दुकान ” असें म्हणतात. यांत पाव बिस्कुटापासून भजी चहापर्यंत आणि मीठ मिरचीपासून गहूं, रव्यापर्यंत सर्व जिन्नस मिळतील.

गांवांतील सारे बालगोपाल शाळाच नसल्यामुळें सकाळ संध्याकाळ रानावनांतून खऱ्या अर्थानें ‘ गोपाल ’ म्हणून मिरवतांना आपल्याला दिसतील. बालकेंच नव्हे तर त्या भागांतील बालिका ६।७ वर्षांच्या झाल्या कीं आपापल्या म्हशी, गाई, बैल घेऊन चारण्यास चाललेल्या आपणास दिसतील.

त्या पहा गांवापासून दूर १०-१२ झोंपड्या दिसत आहेत. त्या कोणाच्या तें आतां तुमच्या सहज लक्षांत आलें असेल. आपण शहरांतील लोक अस्पृश्यता पाळीत नाहीं. पण खेड्यापाड्यांतून तिथें अजून उच्चाटन झालें नाहीं. आज आपण 'हरिजन दिन', 'वन्यपशूपक्षी संरक्षण दिन' साजरे करतों. आपण बोलतों एक आणि कृति करतों एक.

मल्याण गांवांत शिरतांच प्रथम आपणांस एक मारुतीचें देऊळ लागेल. हें देऊळ म्हणजे येणाऱ्या जाणाऱ्यांचें विश्रांतिस्थानच ! गांवकऱ्यांचें न्याय-मंदिर, रिकामटेकड्यांचें पत्त्यांचें अड्डयाचें ठिकाण, लहान लहान बालकांचें गोट्या खेळण्याचें आणि भांडणें करण्याचें ठिकाण—ह्याच ठिकाणीं भांडणें मिटविलीं जातात आणि येथूनच कलागती लावल्या जातात. चैत्रांतील हनुमान-जयंतीचा उत्सव मोठ्या थाटानें ह्याच देवळांत गांवकरी लोक साजरा करतात आणि शिमग्याचे अश्लील प्रकार ह्याच मारुतीरायाच्या मागल्या पटांगणांत धामधुमीनें चालतात.

घारूचा सोना अजून घरीं आला नव्हता. सोनारूपा अजून गांवच्या आजूबाजूला हुंदडत होते.

"बाबा, तुमचा सोना आज मोकळा कसा?" चिमण्या पवार बाबांच्या घरीं येत म्हणाला, "आणि त्याच्या गळ्यांत आज दावें नाहीं. एक लांबलचक दोरी आहे."



"काय सोना मोकळा? गळ्यांत लांब दोरी? घारूचे उपद्व्याप दिसतात हे!" असें म्हणत बाबा सोनाला आणायला निघाले. हे समोरून येतात ना ते घारूचे आजोबा. गांवाच्या बाहेर बाबा आले. त्यांना घारू दिसला. त्याचें अंग धुळीनें भरलें होतें; खरचटलें होतें.

"कायरे घारू कुठं पडलास? आणि हें तुला किती लागलेलें दिसतेय!" बाबा घारूच्याजवळ जात म्हणाले.

"बाबा, सोना–रूपाची झुंज लावली आम्ही. पण लेकाचे झुंज खेळलेच नाहींत!" घारू म्हणाला.

पुढची सारी हकीगत व घारूची युक्ति रामानें बाबांना सांगितली. ती ऐकून बाबा म्हणाले, "चांगले उपद्व्याप आहेत बुवा!" बाबांनीं सोनाला हाक मारली. तो जवळ येतांच झटकन् त्याच्या गळ्यांतली दोरी त्यांनीं धरली व ते घरीं गेले.

* * *

## ३. घारूचे आजोबा

घारूच्या आजोबांचें नांव हरिभाऊ. मल्याण गांवचे ते एक बडे जमीनदार होते. त्यांना सारेजण 'बाबा' या नांवानेंच ओळखीत. साऱ्या अष्टागरांत बाबांना ओळखीत नाहीं अशी एकही व्यक्ति नसेल. जमीनदार म्हणून त्यांची प्रसिद्धी नव्हती तर एक उत्तम मांत्रिक म्हणूनच सारेजण त्यांना ओळखीत.

बाबांच्या हाताला गुण चांगला होता म्हणा कीं त्यांची मंत्रविद्या जोरदार म्हणा, त्यांच्याकडे आलेला रोगी बरा होऊनच जायचा. कुत्र्याच्या विषापासून तों अगदीं जालिम नागाच्या विषापर्यंत ते मंत्रोपचार करीत; औषधें देत आणि हें सारें ते अगदीं विनामूल्य करीत.

शनवार म्हणजे त्यांच्या मंत्राचा मुख्य दिवस. पहाटे चार वाजल्यापासून गांवोगांवच्या गाड्यांतून मंत्रोपचार करून घेण्यासाठीं लोक यायचे. बाबांच्या घराच्या पुढील मांडवांत शनिवारीं पाय ठेवायला जागा मिळावयाची नाहीं. कोणीं अंगावर खरका उठला म्हणून, तर कोणीं कुत्रा चावला म्हणून,

कोणी पान चावलं म्हणून, तर कोणी सापाला धक्का लागला म्हणून, कोणीं डोळ्यांत फूल पडलें म्हणून असे नानाप्रकारचे पीडित झालेले लोक मांडवांत मंत्रोपचार करून घेण्याकरितां बसलेले दिसतील.

शनिवारीं बाबा पहाटे चार वाजतां उठायचे. स्नान, संध्या करून त्यांचें कुलदैवत 'मारुतीराया' त्याची पूजा करून मग ओलेत्यानें त्यांच्या मंत्रोपचाराला सुरवात व्हायची. सर्वांवर उपचार होईतों कधींकधीं त्यांना दुपारचे १२–१ वाजायचे!

मंत्रोपचाराचा मोबदला बाबा कांहीं घेत नाहींत हें बऱ्याच लोकांस माहीत होतें. पण माहीत नसणाऱ्या एकाद्यानें बाबांच्या पुढें कांहीं ठेवलें (भाजी, फळें इ.) तर ते लगेच म्हणतील, मला कांहीं एक देऊं नका!



तुम्हाला काय द्यायचें असेल तें मारुतीरायापुढें ठेवा! ह्या त्यांच्या स्वभावामुळें पुष्कळांना कांहीं द्यावेसें वाटे पण त्यांचा नाइलाज म्हणून कोणी कांहीं देत नसे.

पुष्कळ वेळां बाबांना रात्रीं अपरात्रींसुद्धां मंत्रोपचारासाठीं बाहेरगांवीं जावें लागे. कोणाच्याहिकडून बोलावणें येवो, बाबा कोणालाहि 'नाहीं' म्हणून कधीं म्हणत नसत.

* * *

# ४. थरपिलाचे बैल

घारूच्या घरीं ४।५ गाई, त्यांचीं वासरें, २।३ म्हशी, चार बैल आणि राखण करणारा त्याचा मोत्या कुत्रा इतकीं जनावरें होतीं. त्याच्या घरची गाडी होती. २-३ नोकर घरीं होते.

खेडेगांवच्या मुलांचे खेळ आणि शहरच्या मुलांचे कांहीं खेळ जरी एकच असले तरी कांहीं खेळ खेडयांत दिसतील ते शहरांत दिसणार नाहींत आणि जे शहरांत दिसतील ते खेड्यांत दिसणार नाहींत.

लहान मुलांचे कांहीं खेळ म्हणजे मोठ्यांच्या कृतीची छोटी नक्कलच असते. त्यांच्या खेळांचें आपण बारकाईनें निरीक्षण केल्यास मोठ्यांच्या कामधंद्याचें दर्शन आपणास सहज होईल.

घारूचेहि खेळ अशाच स्वरूपाचे होते. त्याची ओळख त्या गांवच्या बालसोबत्यांशीं आतां होऊं लागली होती. त्यांचे खेळहि तो पाहूं लागला होता.

बालसवंगड्याबरोबर तो कधीं मातीचे बैल करी; कधीं मातीचे बांध घालून लहान लहान शेतें करून त्यांत तो भात लावी, कधीं कलिंगडांची काशी ( बाग ) करीत असे. कधीं भातलावणी करायची तर कधीं भाताची मळणी करून भारे झोडायचे.

त्याचा सर्वांत आवडता खेळ म्हणजे गाडीजोडीचा. एक लहानशी काठी जोखड म्हणून घ्यायची, तिला दोन लहान मुलें बैल म्हणून जोडायचीं. काठीला बांधलेल्या दोऱ्या निवळ्या ( कासरा ) म्हणून हातांत घ्यायच्या; एका हातांत कोणत्या तरी झाडाची एक लहानशी शिपटी ( निमुळती काठी ) घ्यायची आणि—" चक्, चक् " करीत, गांवाच्या आवतीं भोंवतीं धांवायचें; ऊन नाहीं कीं तहान नाहीं !

आज घारू या त्याच्या चिमुकल्या गाडींत बसून (गाडीबरोबर धांवत) गांवांतून फिरत असतां पाटलाच्या दत्तूची थरपिलाची बैलजोडी त्यानें पाहिली. त्याला वाटलें, आपल्यालाहि अशीच बैलजोडी हवी !

त्यानें आपली बैलजोडी सोडली, आणि लगेच तो धांवत धांवत घरीं गेला. आणि "बाबा मला थरपिलाचे बैल हवेत." म्हणून हट्ट धरून बसला.

त्याचा हट्ट पाहून बाबा म्हणाले— " ये माझ्या राजा, तुला थरपिलाचे

बैल हवेत ना ! मी आतां उद्यां चौलला जाईन आणि आणीन हं बैल तुला !" बाबांनीं त्याची समजूत काढीत म्हटलें.

नारळाच्या झावळ्यांचा अगदीं खोडाला चिकटणारा जो भाग असतो त्या भागापासून एक प्रकारचे खेळांतले बैल तिकडचीं मुलें करतात. मल्याण गांव समुद्रकिनाऱ्यापासून चांगलें तीन कोसांवर होतें. तेथें कोठले माड असणार !

शनिवार उजाडला. पहांटेपासून बाबांच्याकडे मंतरलेलें पाणी घेण्यासाठीं खूप खूप गर्दी झाली होती. उजाडल्यावर घारू जागा झाला कीं प्रथम तो बाबा जेथें असतील तेथें जायचा. बाबांचें काम चालू होतें. त्यांचा नातू त्यांच्या भोंवतीं लुडबुड करीत इकडून तिकडे हिंडत होता. बाबांचा नातू ना ! मग कोण त्याला मज्जाव करणार !

उपचार करून घेणाऱ्यांना आपल्याकडून फूल नाहीं फुलाची पाकळी बाबांना देण्याचा एक नवीन मार्ग नातू झाल्यापासून मिळाला होता. पूर्वी कोणी त्यांना देऊं लागलें कीं ते म्हणत—"तुम्हांला काय द्यायचें असेल ते माझ्या मारुतीरायाला द्या. म्हणजे मला पावेल." आतां ते मारुतीला नव्हे, पण या गोपालकृष्णाला देऊन बाबांना आपण कांहींतरी देऊन थोड्यातरी उपकाराची फेड केली म्हणून आपल्या मनाचें समाधान मानून घेत.

"अरे, घारू इकडे ये, हीं केळीं घरांत नेऊन ठेव !" एकानें म्हटलें.

"बाबा म्हणतात कीं, कोणाकडून कांहीं एक घ्यायचें नाहीं ! असें कांहीं आपण घेतलें तर मग माझा मंत्र चालणार नाहीं !"

"लहान मुलांनीं घे म्हटल्यावर घ्यावं. उगीचच चौकशा करूं नयेत. आणि हें आम्ही जें देतों ना तें तुला देतों. बाबांना देत नाहीं !"

घारू हुषार होता. त्याला पाहून कोणालाहि त्याच्याशीं दोन शब्द बोलण्याची इच्छा होई. त्याच्याकडे पाहून कोणीं ना कोणीं दर शनिवारीं त्याला कांहींतरी देत. कोणाकडून केळीं, कोणाकडून फणस, कधीं ताडगोळे, तर कधीं शहाळीं, तर कधीं मोहाचे नारळ घारूच्याकडे भेट म्हणून येत असत.

घारूला कालच्या थरपिलाच्या बैलांची एकाएकी आठवण झाली. तो बाबांच्या जवळ गेला आणि म्हणाला—"बाबा, बाबा, मला तुम्ही आज थरपिलाचे बैल आणणार होता ना ? मग आतां कधीं जाणार चौलला ?"

"एवढं काम झालं कीं निघालोंच !" बाबांनीं खुलासा केला.

" घारू, ए घारू, तुला थरपिलाचे बैल हवेत ना ! मी आतां घरीं जाऊन तयार करतों आणि तुला लगेच पाठवून देतों." चौलच्या एका बागमळेवाल्यानें घारूला बोलावून सांगितलें.

" पण माझे बैल कोण आणणार ? " घारूनें प्रश्न केला.

" अरे, तुमच्या गांवचे धनगर आमच्याकडे घोंगड्या कांबळी घेऊन रोज येतात. त्यांच्यापैकीं एकाजवळ मी तुझे बैल पाठवून देईन ! " मळेवाल्यानें खुलासा करीत म्हटलें.

बाराएकच्या सुमारास गर्दी कमी झाली. चौलचा मळेवाला औषध घेऊन निघून गेला. त्यानें घरीं जातांच थरपिलाचे बैल करून एका धनगराजवळ घारूला दे म्हणून बजावून दिले.

दुपारची वेळ होती. घारू जेऊन थोडा वेळ झोंपला होता. झोंपून उठतो तों त्याच्याजवळ थरपिलाचे बैल पडलेले त्याला दिसले. ते पाहून त्याला फार फार आनंद झाला. त्यानें लगेच एका काठीचें जोखड केलें. बैल जुंपले. हातांत एक शिपटी घेतली. आणि साऱ्या गांवभर बैलजोडी घेऊन



तो हिंडूं लागला. तो रोमकडे गेला, बाबूकडे गेला. शिवा, गौऱ्या, जौऱ्याकडे गेला. आणि त्यांच्या गाडी जोडीच्या गप्पा सुरू झाल्या. गांवांत कोणाचा बैल जोरांत पळतो, कोणाचा अगदीं हळू चालतो वगैरे वगैरे.

अलिबाग तालुक्यांत शेतकऱ्यांना बैलगाडीचा फार नाद आहे. सहज इकडून तिकडे गाडी जात असेल तरी एकमेकांच्या पुढें गाडी जाऊं द्यायची नाहीं.

बोलतां, बोलतां शेवटीं दत्तूच्या व घारूच्या थरपिलाच्या बैलांची शर्यत लागली. सगळे वडाखालच्या पटांगणांत गेले. घारू व दत्तू आप-आपल्या थरपिलाच्या जोड्या घेऊन पवित्र्यांत उभे राहिले.

एक, दोन...तीन !—घारू व दत्तू पांखरांसारखे पळूं लागले. पळतां पळतां घारू दगडाला ठेचाळून पडला. दत्तूनें शर्यत जिंकली. घारूचे ढोपर कोपर खरचटले. छातीला मुका मार लागला आणि तो रडूं लागला. त्याला आपल्याला लागलें म्हणून रडूं आलें नाहीं, तर आतां घरीं आजी ओरडतील म्हणून रडूं आलें.

* * *

## ५. परवाचा

घारूच्या घरचें वळण चांगलें होतें. त्यानें संध्याकाळ होतांच घरीं आलें पाहिजे. हातपाय धुऊन देवाला, वडील मंडळींना नमस्कार करून, शुभंकरोति, परवाचा, श्लोक इ. रोज म्हटलें पाहिजे. त्याच्या आजी नित्य-नेमानें हें सारें करून घेत.


अलीकडे घारू गांवांतील मुलांत निरनिराळे खेळ खेळण्यांत गुंग होई. त्याला घरीं येण्यास अलीकडे उशीर होऊं लागला होता. घारूच्या आजींना त्याला उशीर झालेला मुळींच आवडत नसे.

आजहि तिन्हिसांजा झाल्या. घारू अजून घरीं आला नव्हता. त्याची वाट पहात त्याच्या आजी ओटीवर बसल्या होत्या.

इतक्यांत घारूच्या रडण्याचा आवाज त्यांच्या कानावर गेला. त्या धावतच जरा पुढें झाल्या.

घारू ओक्साबोक्शीं रडत आहे. त्याला एका मुलानें धरलें आहे. त्याचें सारें अंग खरचटलें आहे. त्याच्या मागें ७।८ मुलें आहेत. अशा स्थितींत सारेजण घारूच्या आंगणांत शिरले.

घारूला अशा स्थितींत पाहून आजीचा राग कोठल्या कोठें गेला. त्या झटकन् पुढें आल्या. त्यांनीं 'ये माझ्या राजा !' म्हणत घारूला जवळ घेतलें. त्याचें रडणें ऐकून त्याच्या आत्या आल्या. आई आली. त्याचें सर्व अंग तपासलें. ओठांत दांत शिरल्यानें त्याच्या ओठांतून रक्त येत होतें. त्याला चूळ भरायला सांगितलें. त्याचें सारें अंग पुसून काढलें. खरचटलेल्या ठिकाणीं त्याच्या आत्यांनीं तूपहळद लावलें.



झालेली हकीकत रामनें सर्वांना सांगितली. आपल्याला कोणीं ओरडलें नाहीं म्हणून घारूचें रडणें एकदम थांबलें.

"घारू, आतां लौकर परवचा म्हणून, लगेच जेवायला चल." आजी म्हणाल्या.

घारूच्या मनांत आज पुष्कळ दिवस आपल्या सोबत्यांनाहि परवचा म्हणतांना बरोबर घ्यावें असें होतें. आज आपल्याला अनायसा लागलेलें आहे, तेव्हां आजींकडून आज परवानगी नक्की मिळल अस वाटून तो आजींना म्हणाला, "आजी, मी आज परवचा म्हणतांना माझ्या मित्रांना पण परवचा शिकवूं कां ?"

आजींचा होकार मिळाला. त्यानें हात पाय धुतले. देवाला नमस्कार केला. वडील मंडळींस नमस्कार केला. आणि तो मांडवांत बालमित्र बसले होते तेथें येऊन बसला. तो सर्वांकडे पाहून म्हणाला, "आज मी प्रथम

म्हणतों तें तुम्ही ऐका, नंतर मी तुम्हाला थोडें थोडें शिकवीन." बालसवंगडी जवळ असल्यानें आज त्यानें सर्व कांहीं लक्षपूर्वक न चुकतां म्हटलें. मग त्यानें बालगोपालांना थोडेसें शिकविलें.

" घारू, आतां आम्ही सारे उद्यांपासून रोज येणार संध्याकाळीं परवाचा म्हणायला ! कायरे गौऱ्या ? " राम सगळ्यांकडे पहात म्हणाला.

" हो ! हो ! आम्ही सारे रोज येऊं तुझ्याकडे परवाचा म्हणायला ! शिकवशील ना आम्हांला ? " सारे एकदम म्हणाले.

" हो, अगदीं जरूर ! आतां उद्यांपासून हातपाय धुऊन आणि मोठ्या माणसांना नमस्कार करून यायचं हं ! " घारू सर्वांना बजावीत म्हणाला.

साऱ्यांनीं होकार दिला आणि घारूचे सारे बालमित्र आपापल्या घरीं गेले.

शेतीच्या कामाला गेलेले त्याचे बाबा घरीं आले. घारूचे वडील मुंबई म्युनिसिपालिटींत एक उत्तम शिक्षक म्हणून प्रसिद्ध होते. ते मुंबईसच रहात. दिपवाळी मे महिन्याच्या सुटींत ते घरीं येत.

बाबांना येतांच सारी हकीकत कळली. घारूचें लक्ष सध्यां खेळण्याकडे अधिक असल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. त्याला आतां शाळेंत घालावें पण गांवांत शाळा नाहीं आणि जवळपासही शाळा नाहीं. त्यांनीं मनांत विचार केला, घारूच्या वयाचीं आणि त्यापेक्षां थोडीं मोठीं मुलें गांवांत पुष्कळ आहेत. शिवाय आजूबाजूच्या गांवांतूनहि आपल्याला मुलें मिळूं शकतील. त्यांनीं आपल्याच गांवांत शाळा काढण्याचें ठरविलें.

" राम, ए रामू ( घारूचे चुलते ) उद्यांपासून घारूला दुपारच्या उन्हाच्या वेळीं जरा बसवून कांहीं तरी पाढे, श्री, ग, णे, शा ला सुरवात कर. पोरगं हल्लीं उन्हाचं सारखं भटकतं ! " बाबांनीं आपल्या मुलाला हांक मारून सांगितलं. घारूला आपल्याकडे पाठवून देण्यास सांगून ते स्वयंपाकघरांत निघून गेले.

" बाबा, बाबा, " करीत घारूची स्वारी बाबांकडे धावत आली आणि म्हणाली, " बाबा, आज आम्ही सर्वांनीं परवचा म्हटला. "

" आम्ही ? म्हणजे कोणी ? " बाबांनीं विचारलें.

" राम, बाबू, शिवा, गौऱ्या, जौऱ्या सारे आले होते आज परवचा म्हणायला ! " घारूनें ऐटींत सांगितलें.

बाबांनीं घारूला जवळ घेत म्हटलें, "आणि शर्यत लावतांना पडलास तेंव्हां किती लागलें ?"

"थोडें खरचटलें, बाकी कांहीं नाहीं."

"तुझ्या काकांना हांक मारून आतां जेवायला चल. आणि हें पहा, उद्यां दुपारीं उन्हांतून कोठें हिंडायला जाऊं नकोस. तुझे काका तुला लिहायला शिकवणार आहेत." बाबांनीं घारूच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें.

जेवणें झालीं. दिवसभरच्या श्रमानें आणि मघाशीं पडल्यानें घारूचें अंग चांगलेंच दुखत होतें. अंथरुणावर पडल्या पडल्या त्याला केंव्हांच झोंप लागली.

बाबा मात्र आज अस्वस्थ होते. गांवांत शाळा कधीं काढायचीं, मुलें कशीं जमवावयाचीं, शाळेला जागा कोठली ? इ. प्रश्न त्यांच्यापुढें उभे रहात होते.

बऱ्याच वेळानें त्यांच्या मनाचा निश्चय झाला. आणि मग त्यांना केंव्हां झोंप लागली कोणास कळे !

* * *

## ६. मोहाचा नारळ

मोहाचा नारळ म्हणजे कोकणांतील एक और चीज आहे. तो ज्यानें एकदां खाल्ला त्याला तो पुन्हां पुन्हां खाण्याचा मोह झाल्याशिवाय राहणार नाहीं.

घारूचें गांव समुद्रापासून तीन कोसांवर असल्यानें मल्याण गांवीं नारळाचीं झाडें नव्हतीं. त्याच्या आजोबांनीं आपल्या परसांत २।३ वेळां नारळाचीं रोपें लावून पाहिलीं, पण तीं पुरुष दीड पुरुष होत आणि उभीच्या उभीं वाळून जात. म्हणून त्यांनीं नारळ लावण्याचा नाद आतां सोडून दिला होता.

घारूला शहाळ्याचें पाणी, मोहाचा नारळ फार आवडत असे. त्याचे आजोबा कधीं चौल रेवदंड्याला गेले तर शहाळीं व मोहाचे नारळ आणायला कधीं विसरत नसत

मंतरलेलें पाणी घेण्याकरितां अष्टागरांतील मळेवाले आले तर तेहि

मोहाचा नारळ घारूला भेट म्हणून देत असत. गेल्या शनिवारींच एका बागमळेवाल्यानें २१४ शहाळीं व २१४ मोहाचे नारळ दिले होते. त्याच्या घरीं त्याची आतेबहीण काशी कांहीं दिवसांपूर्वीं रहायला आली होती. तीहि घारूच्याच वयाची होती.

घारू खोडकर होता, अल्लड होता. तुमच्याच सारखा तो कधीं कधीं हट्ट करावयाचा. आज घारू व काशी दुपारच्या वेळीं खेळत होतीं. खेळतां खेळतां तीं दोघे ज्या ठिकाणीं करवंट्या टाकण्याची एक जागा होती तेथें आलीं. करवंट्या पाहून घारूला मळेवाल्यानें दिलेल्या मोहाच्या नारळाची आठवण झाली.

"काशी, तूं कधीं मोहाचा नारळ खाल्ला आहेस का?" घारूनें काशीकडे बघत प्रश्न केला.

"मोहाचा नारळ? अय्या, मी नाहीं बाई कधीं खाल्ला!" काशी आश्चर्य व्यक्त करीत म्हणाली.

"गेल्या शनिवारीं एका बागमळेवाल्यानें २१४ मोहाचे नारळ दिले आहेत. चल, आपण आत्यांना आठवण करूं." घारू काशीचा हात ओढीत म्हणाला.

"नको रे घारू, मावशी, आजी, मामी आतांच झोंपल्या आहेत. त्या ओरडतील आपल्याला." घारूनें धरलेला हात सोडवीत काशी म्हणाली.

"ओरडूं देत ओरडल्या तर! चल, चल, लौकर चल! आत्यांना झोप लागायच्या आंत जाऊं!" काशीचा धरलेला हात न सोडतां तिला ओढीत घारू म्हणाला.

घारूच्या आत्या, आई, काकू, आजी, दुपारचें काम आटोपून माजघरांत दार ओढून नुकत्याच जरा आडव्या झाल्या होत्या. झोपायच्या पूर्वींच त्यांनीं घारूला हांक मारून बजावलें होतें कीं, "आम्ही जरा आडव्या होत आहोंत. आतां जरा घरांत एकसारखें न येतां तास दीडतास निमूटपणें खेळ."

किलकिलें दार उघडून घारू व काशी आंत शिरले. दार उघडतांना दाराची झालेली कर्रSS कर्रSS, आत्यांनीं ऐकली. पण मुद्दामच सर्वांनीं झोपेचें सोंग घेतलें. हेतु हा कीं, सर्वांना झोपा लागलेल्या पाहून तीं दोघें परत जातील—पण घारू निश्चयानेंच आंत आला होता.

घारू पुढें व काशी मागें; पावलांचा आवाज न करतां आत्यांच्या अंथरुणावर बसलीं.

"आत्याऽऽऽ," घारूनें हळूच हांक मारली, त्यांनीं कांहींच हालचाल केली नाहीं. तें पाहून "मावशीऽऽऽ," काशीनेंहि हळूच हांक मारली.

आत्या जाग्या होत्या. दाराची कर्र्रऽऽ, कर्र्रऽऽ, ऐकून त्या जाग्या झालेल्या होत्या. घारू व काशी इतकें बजावूनहि आंत आल्याचें पाहूनच हीं आतां कांहींतरी भुणभुण करणार याची त्यांना जाणीव होऊन, कोणत्या स्वरूपाची ही भुणभुण असणार याचा तर्क करीत होत्या. त्यांनीं मुद्दामच झोपेचें सोंग घेतलें होतें.

दोघांनींहि वरील प्रमाणें हळुहळू एकदोन वेळां हांका मारल्या पण कांहींच उपयोग होईना !

हांक मारून कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहून घारू जरा पुढें सरला. त्यानें आत्यांना हालविलें. पुन्हां हांक मारली.

दुपारची वेळ, तशांत आत्यांची झोंप सावध असते. हेंहि घारूला माहीत असल्यानें आतां सोंग पचणार नाहीं, म्हणून त्यांनीं उसना राग आणला.

"कशालारे हांका मारतां ! जरा आडवी झालेय् तों जरा पडूनसुद्धां देत नाहींत !" असें त्या डोळे मिटूनच पण रागानें म्हणाल्या आणि त्या या कुशीच्या त्या कुशीला झाल्या.

"आत्या, आम्हाला मोहाचा नारळ परवा आणून दिलेल्यांतला हवाय्." घारूनें प्रत्येक शब्द लांब उच्चारीत तोंडाचा चंबू करीत म्हटलें.

"काय ? मोहाचा नारळ ? ठेवलाय् तुमच्या बापानीं !" आत्या कधींच कुणावर रागावत नसत पण आज त्यांनीं उसना राग आणला होता. घारूलाहि त्यांचा स्वभाव पूर्ण परिचित असल्यानें तो गप्प बसला नाहीं.

"बापानीं काय म्हणतां ! चौलच्या मळेवाल्यानें गेल्या शनिवारीं आणून दिलेल्यांतला हवाय् मला !" घारूनें आवाज चढवीत म्हटलें.

"अरे घारू, मी कालच ते फोडून पाहिले. पण त्यांतला एकहि नारळ उरला नाहीं. सारे नारळ साधेच निघाले." आत्यांनींहि जरा वरच्या आवाजांतच सांगितलें.

आतां आपणास मोहाचा नारळ मिळत नाहीं असें पाहून "आम्हांला

मोहाचा नारळ आत्तां हवा !" असें म्हणून दोघांनींहि आपलें रुदनास्त्र काढून दिलें आत्यावर सोडून.

दोघांनीं भोकाड पसरलेलें पाहून आत्यांचा राग कोठच्या कोठें पळाला. आतां या पोरांची समजूत करावी कशी ? अशी त्यांना विवंचना पडली.

"अरे घारू, मळेवाल्यानें दिलेले मोहाचे नारळ मी कालच फोडून पाहिले. पण ते मोहाचे निघाले नाहींत. एकाच पेंडीचे नारळ ! पण त्यांतले कांहीं मोहाचे निघतात, तर कांहीं साधेच निघतात. हेंच तर मोहाच्या नारळाचें मोठें विचित्र आहे. आतां येत्या शनिवारीं मी कोणाला तरी आणायला सांगेन हं !" आत्यांनीं जरा विनवणीच्या स्वरांत सांगितलें.

"मला शनिवारीं नको ! आत्तांच हवाय् !" घारूनें अधिकच मोठ्यानें सूर काढला.

इतक्यांत आत्यांना एक युक्ति सुचली. त्या झटकन् बाहेर गेल्या. करवंट्या टाकण्याच्या ठिकाणीं जाऊन शेंडीकडची एक व विरुद्ध बाजूची एक अशा एकांत एक घट्ट बसतील अशा करवंट्या शोधून त्या एकांत एक घट्ट बसवून त्याचा नारळ तयार केला. तयार झालेला नारळ त्यांनीं ओच्यांत घातला. त्या झटकन् आंत आल्या.

"घारू, साध्या नारळाच्या जवळच परवाचे नारळ ठेवले होते मी एकादा चुकून माकून नारळ राहिला असला तर माळ्यावर जाऊन पाहतें असला तर !" असें म्हणत त्या माळ्याची शिडी चढूं लागल्या.

घारूनें मघाशींच आपल्या मनाशीं तर्क केला होता कीं, आत्यांना आतां कंटाळा आल्यानेंच त्या नाहीं म्हणत असाव्यात. आतां त्यांनीं केलेला खुलासा व त्यांचें शिडीवर झपूझप् चढणें पाहून काशी, घारूच्या तोंडाला आतां पाणी सुटलें. तीं दोघेंहि माळ्याकडे टक लावून पहात होतीं.

"बाबुल्यांनो, आहे रे आहे एक शिल्लक ! मला वाटलें संगळे संपले!',

घारूची आई, काकू, आजी जाग्याच होत्या. त्या मनांत म्हणूं लागल्या. आतां कोठचा मोहाचा नारळ शिल्लक असायला !

इतक्यांत हातांत नारळ घेऊन आत्या खालीं उतरतांना दोघांनीं पाहिल्या'

दोघेंहि धांवत स्वयंपाकघरांत गेले. घारूनें एक वाटी घेतली. काशीनें एक वाटी घेतली. घारूला नारळाचें पाणी फार फार आवडायचें. पडवींत नारळ फोडायचा एक ठरलेला दगड होता. त्या ठिकाणीं दोघेंहि जाऊन

बसले. आत्या आल्या. आणि त्यांनीं धापदिशीं त्या दगडावर नारळ आपटला. एक वाटी फटकन् दूर उडाली. ती आणण्याकरितां घारू झट्कन् धावला. त्यानें घाईनें वाटी उचलली आणि पहातो तों काय ! त्यांत खोबरें नाहीं.

इकडे आत्यांच्या हातांतून शेंडी असलेली दुसरी वाटीहि दुसरीकडे उडाली. ती घेण्याकरितां काशी धावली. तिनेंहि वाटी अधीरतेनें उचलली आणि पहाते तों काय ! त्यांत खोबरें नाहीं.

आतांपर्यंत आत्यांनीं आपलें हसूं कसेंबसें आवरून धरलें होतें. आतां त्यांच्याच्यानें रहावेना. पण आपण हसलों तर आपलें भांडें फुटेल म्हणून त्यांनीं जरा आपल्या बोलण्याचा ओघ बदलला.

" वहिनी अग वहिनी ( घारूची आई ), अग हे ग काय ! या नारळांत खोबरेंहि नाहीं आणि पाण्याचा एक थेंबहि नाहीं ! "

घारूची आई धांवतच बाहेर आली. करवंटीकडे पाहून सारी गंमत तिच्या लक्षांत आली.



" वन्स, असं कसं हो झालें ! काय बाई तरी नवल हें ! " असें ती म्हणाली, आणि त्या दोघी हंसूं लागल्या.

हातांतल्या वाटीकडे पाहून झाल्यावर घारू काशीच्या तोंडाकडे व काशी घारूच्या तोंडाकडे पहात राहिलीं.

" घारू, येत्या शनिवारीं चौलच्या मळेवाल्याला आपण मोहाचे नारळ आणायला सांगूं हं ! " असं म्हणत आत्या घरांत गेल्या, त्यांनीं भाजलेले कडवे वाल आणले आणि दोघांच्या हातावर मूठमूठ ठेवले.

घारू काशीचं कुरंदी जातं कडवे वाल दळूं लागलं. कुडुम्, कुडुम् कुडुम् !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ........ नों. दि. ..............
वि. ........ क्र. ........

## ७. मधाचें पोळें

भर दुपारची वेळ होती. घारूच्या घरांतील सारी मंडळी जेवणखाण आटोपून जरा आडवी झाली होती.

घारू काकांच्याजवळ अभ्यास करीत होता. रोज परवाचा म्हणतांना बऱ्याचशा गोष्टी त्याच्या पाठ झाल्या होत्या. आतां फक्त लेखन आणि वाचन राहिलें होतें. त्याचे काका रोज रोज त्याला नवीन धडा देत. घारू हुशार होता. त्याची बुद्धि तल्लख होती. त्याचा धडा लौकर तयार व्हायचा.

घारूला नवीन धडा देऊन त्याचे काका जरा आडवे झाले आणि थोड्याच वेळांत घोरूं लागले.

मारुतीच्या देवळाशीं मुलांची आरडाओरड चालू होती. त्यांच्या ओरडण्याचा आवाज मधून मधून घारूला ऐकूं येत होता. आज सकाळीं गुरें चारतां चारतां गोऱ्याला मधाचें पोळें दिसलें होतें. तें काढून मध खाण्याचा त्यांचा बेत चालला होता. गुरें सोडायची वेळ आली होती. पण घारू अजून आला नव्हता.

" थांबा हं ! मी आणतों त्याला बोलावून. " राम म्हणाला.

" नको रे बाबा बोलावूंस त्याला. मी परवा सहज गेलों होतों त्याच्या घरीं, तों काका मला रागावले त्याचे ! " केरू रामकडे पहात म्हणाला.

" मी आणतों युक्तीनं बोलावून ! " असें म्हणून राम चालूं लागला.


राम घारूच्या घराच्या जवळ गेला. आणि त्यानें आपली नेहमींची शीळ घातली. त्याची शीळ ऐकून घारू बाहेर आला. त्याला पहातांच रामनें त्याला खुणेनेंच मारुतीच्या देवळाशीं येण्यास सांगून तो परत फिरला.

काका आतां डाराडूर घोरूं लागले होते. तें पाहून घारू हळूच बाहेर पडला व देवळाच्या दिशेनें चालूं लागला. त्याला समोरून येतांना पहातांच सारे ओरडूं लागले, " घारू आला ! घारू आला ! "

घारूनें दुरूनच त्यांना न ओरडण्याबद्दल खूण केली. तो जवळ येतांच त्यांनीं सारा बेत त्याला सांगितला. सर्वांनीं गुरें सोडलीं व ते रानाकडे निघाले.

गुरें चारणीला लावलीं. गौऱ्यानें ज्या झाडावर मधाचें पोळें होतें त्या झाडाखालीं सर्वांना आणलें.

करंजाच्या झाडांना खूप खूप फुलें आलीं होतीं. त्यांचा कडवट गोड वास सगळीकडे पसरला होता. झाडाखालीं करंजाच्या पांढऱ्या फुलांची पखरण पडली होती. मधाचें पोळें करंजाच्या झाडावर होतें. करंजाच्या झाडावरील मध अधिक गुणकारी असतो असें म्हणतात. आजूबाजूला भातशेतांतून कांहीं शेतकरी राब करीत होते. कांहीं शेतांतील राब पेटवून दिले होते. ऊन्ह मी म्हणत होतें. झाडांच्या गर्द छायेंत गुरें आडवीं तिडवीं पडलीं होतीं. पक्षी झाडांच्या गर्द छायेंत झोप घेत होते.



साऱ्या गोवऱ्यांनीं (गुराखी) आपापलीं घोंगड्यां कांबळीं झाडाच्या बुंध्याखालीं असलेल्या कातळावर ठेवलीं. रामनें चूड पेटवली. राम चूड घेऊन झाडावर चढला. त्याच्या पाठोपाठ घारू गौऱ्याहि झाडावर चढले. बाकी सारे झाडाखालीं राहिले.

राम हळूहळू ज्या फांदीला पोंवळें होतें,त्या फांदीच्या खालच्या फांदीच्या बरोबर खालीं गेला आणि त्यानें मधमाशा पळून जाव्या

म्हणून पोळ्याच्या खालीं चूड धरली मात्र ! मधमाशांना धग लागल्यानें त्या चवताळल्या. आणि जो दिसेल त्याला चावत सुटल्या. त्यांनीं रामवर, घारूवर, गौऱ्यावर हल्ला चढवला. माशा चावतांच आई ग ऽ ऽ ऽ, मेलों, मेलों ऽ ऽ ऽ, असें ते ओरडूं लागले. माशा घों घों करीत सैरावैरा पळूं लागल्या. त्यांनीं जीं मुलें खालीं होतीं त्यांच्यावरहि हल्ला चढवला. तेहि ओरडूं लागले.

राम, घारू, गौऱ्या कसेबसे झाडावरून खालीं आले. आणि नाचूं लागले. ओरडूं लागले. घारूला झाडाखालीं जळत असलेली चूड दिसली. ती पाहून त्याला एक युक्ति सुचली. त्यानें भराभरा गवत गोळा करून तें वर्तुळाकार ठेवावयास सांगितलें. मग साऱ्यांना त्याच्या आंत बसावयाला सांगून चुडीनें गवताला आग लावून दिली. आगीचा भडका झाल्याबरोबर मात्र मधमाशा जवळ येईनाशा झाल्या. आणि थोड्याच वेळांत त्यांनीं घोंऽऽ घोंऽऽऽ आवाज करीत तेथून पळ काढला.

घारूच्या युक्तीनें आपली सुटका झालेली पाहून सर्वांना समाधान वाटलें. माशांच्या चाव्यानें सर्वांचीं तोंडें हप्प झालीं. मधमाशी चावली कीं, त्या जागीं एकेक कूस अडकून राहतें. तीं कुसें एकमेकांनीं एकमेकांचीं काढलीं. साऱ्या अंगाची आग आग होत होती. जिथें जिथें माशी चावली तिथें तिथें मोठी गांध आलेली होती. त्यामुळें जवळजवळ सारें अंग प्रत्येकाचें सुजल्यासारखें दिसत होतें.

साऱ्यांचीं तोंडें माकडासारखीं दिसत होतीं.

" माकडा, माकडा हुप्! तुझ्या शेंडीला शेरभर तूप! " असें चिडवायला माशांच्या तावडींतून सुटलेलें तेथें दुसरें कोणीच नव्हतें. माकडाच्या शेंडीला राहो! पण यांच्या मात्र सर्वांगाला तूप नाहीं पण तेल लावायची पाळी आली होती खरी.

" घारू, तूं मागें पडलास तेव्हां तुला तुझ्या घरीं पोहोंचवायला, घरच्या मंडळींची समजूत करायला आम्ही सारेजण आलों होतों. पण आतां आपल्याला आज घरीं कोण पोहोंचवणार? मधमाशांनीं सर्व अंगाचं धिरडं केलं आहेच ! आतां घरीं गेल्यावर काय होईल कोण जाणें ! " राम म्हणाला,

" काय होईल तें होवो ! झालेली हकीकत खरीखरी सांगायची. खरी माहिती सांगूनहि मार मिळाला तर तो आतां सहन करण्यावाचून दुसरा उपाय नाहीं. " घारूनें निश्चयानें सांगितलें.

यावर केरू म्हणाला, " आपण पोळें काढलें नाहीं. कातकरी काढीत होते. तेथें आपण बघावयास गेलों म्हणून आपणास माशा चावल्या असें सांगितल्यानें आपणास मार बसणार नाहीं. "

" घारू म्हणतो त्याप्रमाणें खरें खरेंच आपण सांगितलें पाहिजे. कारण आपण माशा चावल्यानें ओरडत होतों, त्या वेळीं पद्या महाराचा शिद्या धावत आपणाकडे येत होता. पण त्यालाहि माशा चावल्यानें तोहि परत ओरडत गांवाकडे निघून गेलेला मी पाहिला. " रामनें सर्वांना सांगितलें.

शिद्यानें सर्वांना पाहिलें होतें. त्याला माशा चावल्यानें ओरडत ओरडत तो पळत गांवाकडे गेला, तो थेट घारूच्या घराशीं थांबला.

" माई ओ माई ऽ ऽ ऽ ! " त्यानें घारूच्या घराच्या वईपाशीं लांब उभें राहून घारूच्या आत्यांना हाका मारण्याचा सपाटा चालविला. त्याच्या हाका ऐकून आत्या धावतच बाहेर आल्या.

" कायरे बाबुल्या, कोण शिद्या का ? " आत्यांनीं शिद्याकडे पहात म्हटलें.

" माई, घारू, बाबू, राम हीं सगळीं पोरं रानांत बहुतेक पोळं काढीत असावींत. कारण त्यांना माशा चावतांना मी पाहिल्या. माशा चावल्यानं सारीं पोरं ठो, ठो, करून बोंबलत होतीं. म्हणून मी धावतच तिकडे गेलों. तों मलाहि माशा चावल्या. आग्या माशांचं पोळं होतं तें ! एकेक माशी ही एवढाली होती ! म्हणून मी पुढं न जातां धावत तुम्हाला सांगायला आलों घरीं.

शिद्याचें हप्प झालेलें तोंड पहात आत्या म्हणाल्या, " बरं केलंस् रे बाबुल्या आलास ते ! चल मी येते तुझ्याबरोबर—पोरं कुठं आहेत ती मला दाखव. "

शिद्या पुढें आणि घारूच्या आत्या मागें भराभर चालत गांवाबाहेर गेल्या—तोंच समोरून वानर सेना येत असलेली त्यांना दिसली.

आत्यांना पहातांच घारू रडूं लागला. गुन्हा होऊनहि आपण कांहीं-एक न करतां नुसते रडलों कीं बहुतेक शिक्षा होत नाहीं, हें मुलांना चांगलें कळतें.

" कायरे बाबुल्यांनो कशाला असले उद्योग करतां ? " आत्या साऱ्यांकडे पहात घारूला जवळ घेत म्हणाल्या.

रामनें सारी हकीकत आत्यांना सांगितली.

" घारू, मध कधीं बघितली होतीस कीं नाहीं ? माझ्याजवळ मागतास तर चिम्या कातकऱ्याकडून विकत घेऊन मध दिली असती तुम्हा सर्वांना ! आणि माशा चावल्या त्या वेळीं फांदीचे हात सुटले असते तर खालच्या कातळावर आपटून प्राण गेला असता ! " आत्या तावातावानें बोलत होत्या.

इतक्यांत घर जवळ आलं. " बरं, झालं तें झालं. आतां सर्व तुम्ही आमच्याकडे चला. शिवा तूंहि चल ! " आत्यांनीं साऱ्यांना बजावलें व त्या पुढं झाल्या.

आत्या फारशा रागावल्या नाहींत व त्याच पुढें आल्यानें आतां आपणांस बाबा, आजी, आई ओरडणार नाहींत म्हणून घारूचें रडें एकदम थांबलें.

आत्यांनीं साऱ्यांना अंगणांत बसविलें. शिवा अंगणाच्या एका टोंकाला बसला. काका आले, घारूचे गडी आले. त्यांनीं सर्वांच्या अंगावरचीं माशांचीं कुसं काढलीं. आत्यांनीं कापूर घालून खळून दिलेलें खोबरेल तेल सर्वांच्या अंगाला लावलं.

तेल लावतां लावतां रामनें घारूची माशा हाकलण्याची युक्ति तिखट-मीठ लावून सर्वांना सांगितली. ती ऐकून आत्या एकदम म्हणाल्या—

" आहेच बाबुल्या माझा तसा ! "

शिवाला करवंटींतून तेल दिलं. आत्यांनीं सर्वांना खाऊ म्हणून मूठमूठ पोहे व एकेक गुळाचा खडा दिला. पाणी दिलं. आणि साऱ्यांना घरीं जाण्यास सांगितलें.

दिवे लागणीची वेळ जवळ आली होती. घारूनें सर्वांना हातपाय धुऊन व वडील मंडळींना नमस्कार करून परवाचा म्हणायला लौकर या असें सांगितलें.

"आतां आलोंच !" म्हणून सारे बालगोपाल उड्या मारीत निघून गेले.

* * *

## ८. श्रीगणेशा

घारूच्या बाबांना घारूचा कालचा उद्योग कळला. आज त्यांना मंत्रोपचाराकरितां अलिबागचें बोलावणें आलें होतें. त्यांनीं स्नान केलें. मारुतीची पूजा करण्याकरितां ते देवळांत गेले. सकाळीं मारुतीची पूजा व संध्याकाळीं मारुतीरायाच्या दर्शनाचा त्यांचा कधीं नेम चुकला नाहीं.

देवळांतून परततांना त्यांना यशवंत पाटील भेटले.

" रामराम बाबा " पाटलांनीं बाबांना नमस्कार केला.

" रामराम पाटील " बाबांनीं हात जोडून पाटलांना नमस्कार केला.

" बाबा, काल आपल्या वानरसेनेनें केलेला पराक्रम तुम्हांला कळला असेलच ! "

" हो, हो, कळला कीं ! आमचे वीर होते कीं त्यांत, मग कसा नाहीं कळणार पराक्रम ! कातळावर आपटून पोरं मरायचींच पण थोडक्यांत बचावलीं ! " बाबा तावातावानें बोलत होते.

" बाबा, हल्लीं तुमच्या घारून गांवांतील साऱ्या पोरांना चांगलं वळण लावलं आहे. तुमच्या घरीं रोज जमून सारीं उजळणी, श्लोक म्हणतात. आमचा राम हल्लीं त्यांतलं कांहींतरी बडबडत असतो जातां येतां. पण दुपारचीं पोरं उन्हातान्हांतून सारखीं भटकत असतात. आमच्या वेळीं शाळा होती म्हणून आज आम्ही चार ओळी लिहितों वाचतों. पण आतां आमचीं पोरं हिंडताहेत उन्हातान्हांतून. आज शाळा असती तर बरं झालं असतं." यशवंत पाटील चिंतातुर चेहऱ्यानें बोलत होते.

" यशवंत पाटील, पण मल्याण गांवचा शाळा तुमच्याच दुर्लक्षामुळें उठली. :आतां तुमचीं मुलं अशिक्षित रहाणार म्हणून तुम्हांला शाळेचं महत्त्व वाटूं लागलं आहे. माझाहि नातू उनाडक्या करूं लागल्यानं आतां तुमच्यावर अवलंबून न राहतां आपण खटपट करून शाळा पुन्हा सुरू करावी असं माझ्याहि मनांत आतां येऊं लागलं आहे. तुमचाहि विचार दिसतो, तर करा खटपट ! "

गांवांतील मुलें अशिक्षित राहूं नयेत म्हणून बाबांनीं फार दिवसांपूर्वा शाळा सुरू केली होती. त्याच शाळेंत यशवंत पाटील, बाबांचीं मुलें शिकलीं.

पण नंतर मल्याणचे सारे तरुण कामधंद्यानिमित्त मुंबईस गेले. त्यामुळें मुलांची संख्या कमी पडली. गांवकऱ्यांनींहि लक्ष दिलें नाहीं. म्हणून बोर्डानें शाळा बंद करून टाकली.

" बाबा, आजच मी गांवकी भरवून गांवकऱ्यांचा निर्णय घेतों ! पण तुमची मदत हवी मला या कामीं. " यशवंत पाटील म्हणाले.

पद्या महारानें दवंडी दिली. जो तो पद्याला विचारूं लागला, कशा-बद्दल गावकी ( गांवसभा ) आहे आज ? पद्यानें जो विचारील त्याला सभेचा विषय सांगितला. लहान मुलांना गांवांत शाळा होणार हें ऐकून फार फार आनंद झाला.

संध्याकाळ झाली. एकेक गांवकरी मारुतीच्या देवळाजवळ जमूं लागले. यशवंत पाटील आले आणि सभेला सुरवात झाली.

यशवंत पाटलांनीं आज गांवकी बोलावण्याचें कारण सांगितलें. इतक्यांत एक तरुण गांवकरी उभा राहिला आणि तावातावानें बोलूं लागला. " गांवकऱ्यांनो, प्रथम मला हें सांगा कीं, बाबांनीं सुरू केलेली शाळा बंद कोणीं पाडली ? याच पाटलाच्या राज्यांत त्यांनीं सुरू केलेली शाळा बंद पाडली. आतां पुन्हा कशाला सुरू करतां ? "

" हो बरोबर आहे." असें म्हणत दुसरा एक तरुण गांवकरी उठला. " आज आम्ही एवढे मोठे झालों पण आम्ही आंधळे आहोंत. त्यावेळीं शाळा बंद पडल्यानं आम्ही शिकलों नाहीं. आम्हाला लाज वाटते आतां. ती शाळा कुणी बंद पाडली ? "

" याच यशवंत पाटलानं ! " सभेंतून तिसरा एक तरुण खाडकन् उभा रहात म्हणाला, " आतां पाटलाचं पोर शाळेंत जाण्यासारखं झाल्यानं त्याला आतां शाळा आठवली. पण आमच्यासारखीं पोरं गांवांतलीं त्याला दिसलीं नाहींत. त्यावेळीं बाबांनीं शाळा बंद पडूं नये म्हणून अशीच गावकी घेतलेली मला आठवते. "

सभेचें वातावरण एकदम गरम झालें. यशवंतराव पाटलावरच सारे उलटल्यानें तोहि गरम झाला. पण इतक्यांत बाबा दुरून येतांना कांहींनीं पाहिलें.

" बाबा आले, बाबा आले ! " सभेंतून एकच आवाज आला. बाबांनीं गांवकऱ्यांवर अनंत उपकार केल्यानें ते त्यांना भीत असत.

बाबा आले. कांहीं म्हाताऱ्या गांवकऱ्यांनीं त्यांना झालेली हकीगत सांगितली. ती ऐकून घेऊन बाबांनीं बोलावयास सुरवात केली,

" गावकऱ्यांनो, आज तुम्ही एका चांगल्या कामाकरितां जमले आहांत. मागें कोण कसें चुकलें हें न पहातां आतां पुढें आपणांस काय करायला हवें तें पहा. आज सगळ्या खेड्यांतून भराभर शाळा सुरू होत आहेत. अशा वेळीं न भांडतां सगळ्यांच्या विचारानं तुम्ही पुन्हां शाळा सुरू केलीत तर तुमचींच मुलंबाळं शिकून शहाणीं होतील. तात्पुरता फायदा कुणाचा आहे हें बघत बसूं नका. कांहीं तरुण मला सुद्धां म्हणतील कीं, नातू मोठा झाला आहे म्हणून यांना शाळेचा पुळका आला आहे म्हणून ! तेव्हां कोणा व्यक्तीच्या फायद्याकडे न पाहतां यांत आपणा सर्वांचें हित आहे कीं नाहीं ? हें बघा. आजच मी अलिबागला अनायसा गेलों होतों. सकाळीं पाटलांचें या विषयावर माझें बोलणें झालें होतें. म्हणून मी येतांना शिक्षणाधिकाऱ्यांना भेटलों. त्यांनीं गांवकऱ्यांचा शाळामागणीचा अर्ज येतांच मंजुरी देऊन तावडतोब शिक्षक देण्याचें कबूल केलें आहे. आतां गुढीपाडवा जवळ आला आहे. नीट विचार करा. आणि नक्की विचार होत असेल तर अर्ज करून तो मजकडे द्या."

नथू पाटील उभे राहून म्हणाले--" पण शाळा कोणत्या जागेंत भरवावयाची ? ".

" मागें जशी माझ्या जागेंत शाळा भरायची तशीच ती आतांहि भरेल. पूर्वीं दिलेली सर्व जागा मी शाळेला द्यायला तयार आहें." बाबांनीं खुलासा केला.

शाळा सुरू करण्याचें निश्चित ठरून गांवकी संपली. गांवकरी मंडळींच्या सल्ला घेऊन एकदोन दिवसांत अर्ज बाबांकडे नेऊन द्यायचें ठरलें.

गांवकऱ्यांच्या अर्जाप्रमाणें शिक्षणाधिकाऱ्यांनीं माळी गुरुजींची नेमणूक मल्याण गांवच्या नवीन शाळेवर केली.

गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशीं माळी गुरुजी मल्याणला आले, ते प्रथम थेट गांवच्या यशवंत पाटलांचें घर विचारीत त्यांच्या घरीं गेले. त्यांनीं आपलें नांव सांगून आपली नेमणूक या गांवच्या शाळेवर झाल्याचें सांगितलें.

गुरुजींना घेऊन पाटील बाबांच्याकडे आले. बाबांनीं गुरुजींची विचारपूस केली. शाळेच्या जवळची एक खोली बाबांनीं गुरुजींस आपण

होऊन दिली. तुम्ही आमच्या घारूचे गुरुजी, उद्याच्या चांगल्या मुहूर्तावर शाळा सुरू होत आहे, याबद्दल फार फार आनंद होत असल्याचें त्यांनीं सांगितलें. गुरुजी तुम्ही आणि पाटील तुम्ही उद्यां आमच्याकडे जेवायला या असें बाबांनीं त्यांना बजावून सांगितलें.

"बाबा, तुमच्या हस्तें उद्यां शाळेचें उद्‌घाटन करण्याचें आम्ही गांव-कऱ्यांनीं ठरविलें आहे." पाटलांनीं सांगितलें. बाबांनीं आढेवेढे घेऊन शेवटीं होकार दिला. बाबांचा निरोप घेऊन पाटील व गुरुजी उठले.

इकडे शाळा सुरू होण्याचा खरा आनंद घारूला आणि घारूच्या बालसोबत्यांना झाला होता. त्यांची मारुतीच्या मागें एका नांद्रुकीच्या झाडा-खालीं बालगांवकी जमली होती. पाटलांच्या बरोबर हिंडणारे गुरुजी त्यांनीं पाहिले होते. त्यांच्याबद्दल प्रथम त्यांच्यांत चर्चा झाली. कुणी म्हणाले गुरुजी अगदीं शांत दिसतात. तेव्हां आपल्याला भीति वाटत नाहीं. घारूनें उद्याच्या सकाळच्या कार्यक्रमाची माहिती सांगण्यास सुरवात केली. "आज



संध्याकाळीं परवाचा म्हणायला येतांना तुम्ही आपापली पाटी स्वच्छ घासून आणा. मी माझ्या काकांच्या जवळ सरस्वति कशी काढायची तें शिकून

घेतों. मग आपण त्यावर सरस्वति काढूं. तसेंच येतांना प्रत्येकानें आपल्या बागेंतील फुलें घेऊन या. माझे काका म्हणाले कीं, मुलांच्या तर्फे एक हार उद्यां तुम्ही गुरुजींना घाला. म्हणून आपण नंतर हारहि करूं. तसेंच माझी आई आपणा सर्वांना एक सरस्वतीचें गाणें शिकवणार आहे. तें आपण पाठ करूं." असा सर्व बेत ठरून बालगावकी संपली.

दिवेलागणीची वेळ झाली. बालगोपाल पाट्या स्वच्छ करून घारूच्या अंगणांत जमले. पाट्यांवरून सरस्वति काढली. गांवांतील बालिकाहि आल्या होत्या. त्यांनीं हार केला. नंतर मुलामुलींची निवड करून घारूच्या आत्यांनीं, आईनें त्यांना सरस्वतीचें गीत म्हणावयास शिकविलें.

घारूला व रामला घारूच्या काकांनीं दोन शब्द कसे बोलावे तें सांगितलें. ते त्यांच्याकडून परत परत म्हणून घेतले. सर्वांनीं शुभं करोती, परवाचा, श्लोक म्हटले. उद्या सकाळीं लौकर शाळेंत यायचें ठरून बाल-गोपाल घरीं गेले.

* * *

## ९. ज्ञानमंदिर

पाडव्याचा दिवस उजाडला. घारूनें स्नान केलें. एक बांबूची उंच काठी घेतली. त्याच्या टोंकाला कडुनिंबाची फांदी बांधली. एक जरीचा खण बांधला. त्यावर एक चांदीचें भांडें उपडें घातलें आणि सारवलेल्या, रांगोळी घातलेल्या जागेवर गुढी उभारली. मग त्यानें तिची पूजा केली. गांव-कऱ्यांनींहि आज लौकर गुढ्या उभारल्या व ते शाळेसमोरील पटांगणांत जमूं लागले. बाल–बालिका चांगला पोषाख करून आपापल्या पाट्या घेऊन शाळेच्या पटांगणांत जमूं लागल्या.

समारंभाची वेळ झाली. यशवंत पाटील आले. त्यांचे मागे बाबा आले. यांचे मागोमाग माळी गुरुजी आले. मुलें उभीं राहिलीं. बाबांनीं मुलांना बसावयास सांगितलें.

यशवंत पाटील उभे राहून बोलूं लागले—"बाबासाहेब, गांवकरी मंडळी, बाळांनो, आज आपण सारे बाबांच्या हस्तें शाळेचें उद्घाटन होणार

आहे म्हणून जमलों आहोंत. बाबांनीं मनावर घेतलें म्हणून आपल्या गांवांत पुन्हा शाळा सुरू होत आहे. त्यांच्याच हस्तें शाळेचें उद्‌घाटन होणें गांवकऱ्यांना योग्य वाटल्यानें त्यांनीं आज त्यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति केली. ती बाबांनीं मान्य केली आणि ते येथें आले त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतों. तुमच्या सर्वांच्या वतीनें त्यांनीं शाळेचें उद्‌घाटन करावें अशी मी त्यांना विनंति करतों."

बाबा उठले. शाळेच्या दाराला लावलेला पडदा बाजूला सारून ते आपल्या जागेवर येऊन बोलूं लागले.

श्रीगणेशा



"गांवकरी मंडळी, गुरुजी आणि बालगोपालांनो, आजच्या या शुभमुहूर्तावर शाळा सुरू झाल्याचें जाहीर करण्यांत मला फार फार आनंद होतो. विशेषतः बाळांनो, तुमच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मला खरो-खरीच आज फार समाधान होत आहे. मघाशी पाटलांनीं मी मेहनत केल्याचें सांगितलें, पण तें खरें नाहीं. तुम्ही आपलीं मुलें शाळेंत पाठवावयाचें ठर-विलेंत म्हणून आजचा हा सुयोग आला आहे.

बाळांनो, तुमच्याकरितां शाळा आहे. तुम्ही न चुकतां नुसते रोज हजर राहिलांत तरी तुम्हांला अभ्यास येईल. शाळेच्या वेळांत तुमचे आईबाप कांहीं शेतीचीं कामें सांगतील, पण तिकडे लक्ष न देतां तुम्ही नेमानें शाळेंत याल तर आजच्या दिवसाचें महत्त्व राहील.

प्रत्येक गांवांत जसें देवाचें मंदिर असतें तसें प्रत्येक गांवाला शाळा ही हवीच ! ज्या गांवांत शाळा नाहीं तें गांव उदास, भकास दिसतें. आज-पर्यंत मल्याण गांवहि शाळेच्या अभावीं उजाड वाटायचें. पण मल्याण गांवाला खरी शोभा आज आली. देवाच्या मंदिराप्रमाणें हें ज्ञानमंदिर हवेंच !

तुम्हाला आजपासून हे माझ्याजवळ बसलेले माळीगुरुजी शिकवतील. माळीगुरुजींची मी कालपासून माहिती मिळविली. त्यावरून आमच्या गांवाला त्यांचेसारखे हुषार गुरुजी लाभले हें आमचें व आमच्या मुलांचें भाग्य आहे." शेवटीं गांवकऱ्यांचे आभार मानून बाबा खालीं बसले.

" आतां सरस्वतिपूजन होईल." असें यशवंत पाटलांनीं उभे राहून सांगितलें.

सगळ्या बाल-बालिकांनीं पाटीवरील सरस्वतीचें पूजन केलें. आणि कांहीं मुलांनीं नंतर गीत म्हटलें.

" आतां गुरुपूजन होईल." यशवंत पाटलांनीं सांगितलें.

घारू भीत भीत पुढें आला आणि बोलण्याचा प्रयत्न करूं लागला— " बा ऽऽ बा नव्हे अध्यक्षमहाराज, गांवकरी आणि मित्रहो—आपल्याला आजपासून माळीगुरुजी श्री, ग शिकवणार आहेत. आम्ही त्यांना पाहिलें तर माझा एक मित्र म्हणाला, गुरुजी तापट दिसताहेत. मी म्हटलें, नाहीं गुरुजी लांबून तरी प्रेमळ वाटतात. आतां ते कसे आहेत तें समजेलच म्हणा ! आम्ही सर्वांनीं रोज रोज शाळेंत यायचें कबूल केलें आहे." इतकें म्हणून घारू गुरुजींच्या जवळ गेला. त्यानें गुरुजींच्या हातावर नारळ दक्षिणा ठेवली. त्यांच्या गळ्यांत काल करून ठेवलेला हार घातला. आणि घारूनें गुरुजींच्या पायावर डोकें ठेवून त्यांना नमस्कार केला. टाळ्यांचा कडकडाट झाला. आणि माळीगुरुजी बोलावयास उभे राहिले.

" अध्यक्षमहाराज, गांवकरी मंडळी आणि बाल-बालिकांनो, मी आतां-पर्यंत पुष्कळ गांवें हिंडलों पण तुमच्या गांवाइतकी एकदिली मी फारच थोड्या ठिकाणीं पाहिली. लहान असतांना मी या गांवची प्रसिद्धी ऐकिलेली आहे.

इतकेंच नव्हे तर तुमच्या गांवचीं नाटकं मी त्या वेळीं या गांवांत येऊन पाहिलीं आहेत. त्यांतल्या त्यांत ह्या गांवच्या गांवकऱ्यांनीं केलेलें "तुकाराम" नाटक मी कधींहि विसरणार नाहीं. शिक्षणाचा प्रसार ज्यावेळीं इतकासा झाला नव्हता त्यावेळीं तुमच्या गांवीं शाळा होती हें मला माहीत आहे. आजचे तुमचे पाटील त्यावेळचे या शाळेचे विद्यार्थी आहेत. तुकाराम नाटकांतील त्यांनीं कलेलें तुकारामाचें काम मी कधींच विसरणार नाहीं. त्यांनीं ही भूमिका इतकी चांगली वठवली, त्याचीं जीं अनेक कारणें असतील त्यांत प्रमुख कारण ते शिक्षित आहेत हें आहे. आजचे आपले अध्यक्ष यांना मी आज बरींच वर्षें ओळखत आहें. हजारों लोकांवर त्यांनीं केलेले अनंत उपकार मी ओळखतों. गांवांत शाळा नसतांना येथील मुलें शाळेंत जाणाऱ्या मुलांप्रमाणें वावरतात याचें मला विशेष आश्चर्य वाटतें. आणि त्याला कारणहि बाबा आणि त्यांचा नातू घारूच आहेत. त्याच्या आजच्या वर्तणुकीकडे पाहून बाबांसारखें तो आपलें नांव काढील यांत कसलीच शंका नाहीं. अशा या गांवांत माझी शिक्षक म्हणून नेमणूक झाली हें मी माझें भाग्य समजतों. आज शिक्षकांना मान नाहीं. मी या गांवांत आजच आलों. तुम्ही माझा या ठिकाणीं जो सन्मान केला, त्यानें मी भारावून गेलों आहें. याबद्दल मी तुमचे सर्वांचे आभार मानून रजा घेतों." मग टाळ्यांचा कडकडाट झाला.

झुलबा पाटील हातांत एक भला मोठा हार घेऊन उभे राहिले. त्यांनीं प्रथम बाबांचे आभार मानून त्यांच्या गळ्यांत हार घातला. गांवकऱ्यांचे आणि गुरुजींचे आभार मानून हा गोड समारंभ संपला.

* * *

## १०. डोहऱ्यांतून काढलें

दुपारची वेळ होती. एकदां घारू व त्याचे सोबती खेळतां खेळतां माळावर गेले. तेथें त्यांना काळे, पांढरे, तांबडे चतुर इकडून तिकडे उडतांना दिसले. घारूच्या सोबत्यांना वाटलें आपण त्यांना पकडावें.

मुलांना फुलपांखरें पकडायला आवडतात. चतुर पकडायला आवडतात. तीं त्यांच्या मागें एकदां लागलीं कीं, त्यांना दगड दिसत नाहींत,

काटेकुटे दिसत नाहींत, भूक लागत नाहीं कीं तहान लागत नाहीं!

चतुर झाडावर बसला कीं घारूचे सोबती हळूच जवळ जात. आपली चिमटी त्याच्या निमुळत्या भागाजवळ हळूच नेत. आतां चिमटी मिटून चतुर पकडणार, तोंच चतुर उडून जायचा. व त्यांची निराशा व्हायची!

उडालेल्या चतुराच्या मागें पुन्हा हळूहळू जायचें, तो कोठें बसतोय हें पहायचें. तो बसला कीं त्याला पकडण्यासाठीं पुन्हा आपली चिमुकली चिमटी पुढें करायची. चिमटी मिटतांच त्याच्या आधींच चतुरांनीं पळायचें असें त्यांचें चाललें होतें.

राम, शिवा, गौऱ्या, जौऱ्या सारे सारे चतुराच्या मागें लागलेले घारूनें पाहिलें. त्याला वाटलें आपणहि चतुर पकडावा. तोहि एका चतुराच्या मागें लागला. चतुराच्या मागें हळूहळू जायचें. त्याच्या निमुळत्या भागाजवळ आपली चिमटी न्यावयाची. चिमटी मिटून आतां चतुर पकडणार तोंच त्यानें उडून जावें. असें त्याचें चाललें होतें. चतुराच्या मागें लागतां लागतां तो एका भोकराच्या झाडाखालीं आला. त्याचा पाय एका पिकलेल्या भोकरावर पडला. भोकरातून बी सट्कन् निघाली व त्याच्या पायाला चिकटली. ती पाहून त्याला एक युक्ति सुचली.

त्यानें एक लांब काठी घेतली. तिच्या टोंकाला त्यानें भोकराची बी लावली. आणि तो इकडे तिकडे पाहूं लागला. तोंच त्याला एका झुडपावर एक तांबडा चतुर बसलेला दिसला.

तो हळूहळू त्या झुडपाजवळ गेला. त्यानें भोकराची बी लावलेली काठी हळूच लांब केली. आणि काठीच्या टोंकाला लावलेली बी चतुराला लावली. चतुराचे पंख भोकराची बी चिकट असल्यानें त्याला चिकटले.

घारूनें झट्कन् चतुराचे पंख पकडले.

"अरे राम, शिवा, गौऱ्या, इकडे या इकडे! हा पहा मी चतुर पकडला चतुर!" घारूनें जोरानें ओरडून सांगितलें.

घारूचे सगळे सवंगडी घारूची हाक ऐकून धावत धावत आले घारूच्या हातांतील चतुराकडे पाहूं लागले.

"अरे घारू, हीं काठी आणि तिच्या शेवटाला ही भोकराची बी कशाला लावली आहेस!" राम घारूच्या हातांतील काठीकडे पहात म्हणाला.

" हीच तर गंमत आहे चतुर पकडण्याची ! " घारूनें ठसक्यांत उत्तर दिलें.

" या काठीनें कसा काय बुवा चतुर पकडायचा ! " शिवा आश्चर्यानें म्हणाला.

" मला एकादा चतुर दाखवा. म्हणजे मी त्याला आत्तां पकडून दाखवितो ! " घारू सभोंवार पहात म्हणाला.

" तो······तो······पहा ! " गोऱ्या एका चतुराकडे बोट दाखवीत म्हणाला.

घारूनें भोकराची बी लावलेली काठी पुढें करून चतुराच्या दिशेनें हळू हळू पावलें टाकायला सुरवात केली. तो चतुराच्या जवळ गेला, आणि काठीचें टोंक चतुराला टेकविलें. त्याबरोबर/चतुर भोकराच्या बीला चिकटला.

" वा घारू ! छान युक्ति शोधून काढलीस ! " सारे एकदम ओरडले.

क्षणांत काठ्या व त्यांच्या टोकाला भोकराच्या बिया लावल्या गेल्या. आणि झटाझट चतुर पकडण्याचा कारखाना सुरू झाला.

पकडलेल्या चतुराचे कोणी पंख तोडले. कोणी त्याच्या शेपटाला दोरी बांधून पतंगाप्रमाणें उडवूं लागलें. कोणी त्याच्याकडून खडे उचलण्याचें काम करून घेऊं लागले. कोणी पंख तोडलेल्या चतुरांची झुंझ झुंझवूं लागले.

या वानरसेनेच्याजवळ जाणते कोणीं नव्हतें म्हणून ठीक ! नाहींतर त्याच्याच्यानें या वानरसेनेनें चतुराला दिलेल्या शिक्षा पाहवल्या नसत्या.

इकडे आज चुकून मित्राचा धाकटा भाऊ–शिवा–त्यांच्या मागें मागें हळूच आला होता. तो आल्याचें मित्राच्या लक्षांत आलें होतें. पण चतुर पकडण्याच्या नादांत तो त्याला कांहीं एक बोलला नव्हता.

सारे सारे चतुराच्या मागे लागलेले पाहून शिवाला वाटलें, आपणहि चतुर पकडावा. मोठ्या मुलांच्या प्रमाणें त्यानेंहि एक काठी घेतली. काठीला लावायला भोकरीची बी हवी म्हणून तो भोकरीच्या झाडाखालीं गेला. त्यानें झाडाखालीं इकडे तिकडे पाहिलें, पण त्याला एकहि भोकर खालीं पडलेलें दिसलें नाहीं.

भोकरीचें झाड डोहऱ्याच्या ( कच्ची विहीर ) अगदीं जवळ होतें. त्याच्या कांहीं फांद्या डोहऱ्यावर वाकल्या होत्या.

शिवाला झाडाखालीं एकहि भोकर मिळालें नाहीं. कारण घारूच्या वानरसेनेनें झाडाखालीं पडलेलीं सारीं सारीं भोकरें वेंचलीं होतीं. आतां तो झाडावर पिकलेलीं भोकरें कोठें दिसतात का म्हणून बारकाईनें पाहूं लागला. झाडावर खूप भोकरें पिकलीं होतीं. पण तीं त्याच्या हातीं कशी येणार? बघतां बघतां त्याचें लक्ष डोहऱ्यावरील झुकलेल्या एका फांदीकडे गेलें. तिच्या एका टोंकाला २–३ भोंकरें पिकून अगदीं पिवळीं पिवळीं झालीं होतीं. ती फांदी त्याच्या हातांत सहज येण्यासारखी होती. पण ती होती डोहऱ्यावर !

डोहऱ्याच्या कांठावर उभा राहून तो तीं घेण्याचा प्रयत्न करूं लागला. पाय उंचावून त्यानें कसेंबसें फांदीचें एक पान चिमटींत धरलें व तो ती फांदी हळू हळू खालीं ओढूं लागला. इतक्यांत पान तुटून हातांत आलें व फांदी सप्‌कन् वर गेली.

डोहऱ्याच्या कांठावर असलेल्या दगडावर पाय ठेवून फांदी धरण्याचा तो प्रयत्न करूं लागला. इतक्यांत पायाखालचा दगड घसरून डोहऱ्यांत पडला व त्याबरोबर धाड्‌दिशीं शिवाही डोहऱ्यांत पडला.



मेलों ! मेलों !! मेलों !!! असा त्याच्या ओरडण्याचा आणि

धपदिशीं पडल्याचा आवाज सर्वांच्या कानांत शिरला. झाला प्रकार घारूच्या व त्याच्या सोबत्यांच्या लक्षांत आला. ते सारे डोहऱ्याकडे धावले.

राम, तूं वर थांब ! असें म्हणत क्षणाचाहि विलंब न लावतां घारूनें धाडकन् डोहऱ्यांत उडी टाकली. तो झरकन् पाण्यांतून वर आला. त्यानें रामला ओरडून सांगितलें,—

" अरे, राम, होकटी खालीं कर. "

राम झट्‌कन् पुढें झाला. त्यानें डोहऱ्यावरील होकटी ( तरफेच्या सहाय्यानें पाणी काढण्याचें एक साधन ) खाली केली.

होकटीच्या बांबूला धरून घारूनें पाण्यांत बुडी मारली व शिवाची लंगोटी धरून त्यानें त्याला वर काढलें. घारूनें झट्‌कन् उडी मारल्यानें शिवाच्या नाकातोंडांत पाणी जाण्याच्या आंत त्याला वर काढल्यानें तो मोठमोठ्यानें रडूं लागला. पाण्यांत वरून पडल्यानें तो खूप घाबरला होता.

रामनें वरून व घारूनें खालून आधार देत देत त्याला कसें बसें वर काढलें.

शिवा डोहऱ्यांत पडल्याचा आणि त्याच्या मेलो, मेलो ओरडण्याचा आवाज ऐकून आणि घारूनें डोहऱ्यांत उडी टाकलेली पाहून घारूच्या सोबत्यांपैकीं कांहीं घारूच्या घरीं तर कांहीं शिवाच्या घरीं बातमी सांगण्या-करितां धावत गेले होते.

मुलांचा निरोप ऐकतांच घारूच्या आत्या, आई, शिवाचे बाबा, आणि बातमी पोहोंचविणारीं मुलें डोहऱ्याच्या दिशेनें धावत सुटलीं.

इकडे शिवाला भिवानें खांद्यावर घेतलें आणि घारूला कांहीं मुलांनीं उचलून घेऊन " घारूदादा की जय ! " असा जयघोष करीत सारी वानरसेना गांवाकडे येत होती. घारूच्या आईला, आत्यांना पाहून तीं अधिकच जोरानें ओरडूं लागलीं.

घारूला व शिवाला सुरक्षित पाहून साऱ्यांचा जीव भांड्यांत पडला. शिवाच्या बाबांनीं धावत येऊन शिवाला घेतलें. त्याच्या अंगावरून प्रेमानें हात फिरवून त्याला उगें केलें.

रामनें आत्यांना, घारूच्या आईला, शिवाच्या बाबांना सारी सारी हकीगत सांगितली.

" बाबुल्यांनो, मुक्या प्राण्यांना त्रास देऊं नये! उन्हातान्हाच्या वेळीं तुम्ही आला नसतात तर हा प्रसंग आला नसता. घारू, तूं आज शिवाचे प्राण वाचवलेस हे फार चांगलें केलेस! बुडत्याला वाचवतांना मोठमोठे पोहोणारे सुद्धां बुडणाऱ्यानें घाबरून मारलेल्या मिठीनें बुडून मेल्याचीं पुष्कळ उदाहरणें मीं वाचलीं आहेत."

घडला सर्व प्रकार ऐकून शिवाच्या बाबांच्या तोंडून " घारू, तूं होतास म्हणून माझा शिवा आज वाचला!" असे सहज उद्गार बाहेर पडले.

* * *

## ११. " बालानंद "

दिवाळी जवळ आली. गांवांतून मधून मधून फटाक्यांचे आवाज घारूच्या कानावर पडूं लागले.

" आत्या, मला फटाके आणा की!" घारूची फटाके आणण्या-बद्दलची भुणभुण एकसारखी सुरू झाली.

" अरे, घारू, दिपवाळीच्या सुटींत नाना–( घारूचे वडील ) आतां घरीं येतील. त्यांनाच आतां फटाके आणायला सांग कीं एक पत्र लिहून." आत्यांनीं आपल्या मागची ब्याद टाळण्याच्या निमित्तानें घारूला सांगितलें.

" पण मला येत नाहीं पत्र लिहायला!" घारू फुरंगटून म्हणाला.

" नाहीं म्हणजे काय! तुला आतां सुंदर लिहितां येतें ना! काकांना विचारून एक पत्र लिही नानांना!" आत्यांनीं खुलासा केला.

" काका, मला नानांना एक पत्र लिहायचंय्. कसं लिहायचं हो?" घारूनें काकांना विचारलें.

" पत्र लिहितांना आरंभ व शेवट ठरलेला असतो. तो तुला मी सांगतों. बाकी मधला मजकूर तुला जो लिहावयाचा असेल तो तूं लिही." काकांनीं पत्राबद्दल खुलासा केला.


घारूनें नानांना एक पत्र लिहिलें. त्यांत मुख्य मुद्दा येतांना फटाके आणण्याबद्दलचा होता. पत्र लिहून झाल्यावर मारुतीच्या देवळाजवळ लावलेल्या पत्राच्या पेटींत त्यानें तें नेऊन टाकलें.

खेडेगांवांतून आठवड्यांतून दोनदां पोस्टमन यायचा. मल्याणच्या आजूबाजूला जीं खेडेगांवें होतीं त्या गांवीं सोमवारीं व शुक्रवारीं भाऊ पोस्टमन यायचा. भाऊ पोस्टमन स्वभावानें गोड होता. तो खऱ्या अर्थानें गांवांतील लहानथोरांचा भाऊ होता.

मुंबईसारख्या शहरांतून आणि खेड्यापाड्यांतून पोस्टमनचें काम करणें मोठें अवघड असतें. खेड्यांतून सारे शेतकरी आपापल्या शेतीच्या कामा-करितां शेतावर असायचे ! मग त्यांच्या घरीं कोण भेटणार ?

शाळा सुरू होण्यापूर्वीं मल्याणला भाऊ पोस्टमन आला कीं हुश्य ऽऽ! हुश्य ऽऽ! करीत देवळाच्या पडवींत बसायचा. तो आला कीं त्याच्या भोंवतीं रिकामटेकड्या पोरांचा गराडा पडायचा ! पोतडींतील पत्रें काढून तो एकेकांचीं नांवें वाचायचा. ‘ चिमण्या वाळू,’ ‘ नथू गणपत ’ जमलेल्या मुलांतून आवाज यायचा—‘ द्या इकडे ! मी पोहोंचवतो ! ’ मग भाऊ पोस्टमन एकेकाच्या हातीं पत्र द्यायचा ! आतां शाळा सुरू झाल्यापासून भाऊ पोस्टमन नेमका शाळेंत जाऊन पत्राचा बटवडा करायचा.

कुणाचें पत्र यायचें असलें कीं, मनिऑर्डर यायची असेल तर, कुणाला कार्ड, पाकिटें, तिकिटें हवीं असलीं तर देवळापाशीं जमून त्याच्या वाटेकडे सोमवारीं, शुक्रवारीं लोक डोळे लावून बसलेले असायचे.



भाऊ पोस्टमन आल्यावर आलेलीं पत्रें द्यायचीं, कुणाला तिकिटें, कुणाला पाकिटें, कुणाला मनिऑर्डरचे फॉर्म, कुणाला कांहीं, कुणाला कांहीं आपल्या पोतडींतून काढून द्यायचा—त्याच्या पोतडींत सारें पोस्ट ऑफिस सामावलेलें असायचें !

असाच एके दिवशीं भाऊ पोस्टमन घाईघाईनें शाळेंत शिरला.

" घारू ए घारू ! तुझ्या नांवावर आज एक पत्र आणि कसला तरी अंक आलाय बोवा ! " घारूला हाक मारीत भाऊ पोस्टमन म्हणाला.

घारू आपल्या जागेवरून धावतच आला आणि त्यानें भाऊच्या हातांतून पत्र व अंक जवळ जवळ हिसकावूनच घेतला. प्रथम त्याची नजर पत्राकडे गेली. तें त्याच्या नानांचें होतें. तो तें वाचूं लागला—

॥ श्री ॥

रंगाऱ्याची चाळ
खडा माटुंगा, मुंबई
दि.............

चि. घारूस अनेक आशीर्वाद वि.

तुझें अगदीं पहिल्यांदाच लिहिलेलें गोड गोड पत्र वाचून फार फार आनंद झाला. दिवाळीच्या सुटींत घरीं येतांना मी तुझ्याकरितां फटाके आणावेत असें तूं लिहितोस, म्हणून मी आज तुला त्याबद्दल थोडेसें सांगणार आहें.

केवळ डोळ्याच्या आणि कानाच्या समाधानाकरितां आपण कोट्यवधि रुपये दिवाळींत केवळ दारूपायीं खर्च करतो हें ठीक नाहीं. त्यांतल्याह्यांत खेडेगांवांत फटाके मुळींच वाजवूं नयेत या मताचा मी आहें. खेड्यांतील घरें पेंढ्यांचीं असतात, खेड्याच्या आजूबाजूला पेंढ्यांचे माच असतात, घराच्या आसपास खूपच गवत वाढून वाळलेलें असतें. अशा वेळीं एखादी ठिणगी पडण्याचा अवकाश ! फटाक्याच्या ठिणगीमुळें गांवेंच्या गावें राख झाल्याचें मीं वाचलें आहे. म्हणून मी तुला फटाके आणणार नाहीं. मात्र फटाक्यांना जितके पैसे खर्च करावयाचे तितक्याच पैशांची एक गम्मत मात्र पाठवीत आहे. ती तुला या पत्राबरोबरच मिळेल. ती तुला खात्रीनें आवडेल.

श्री. माळी गुरुजींच्या संमतीनें फटाक्यांपुरता मजकूर मुद्दाम सर्व विद्यार्थ्यांना वाचून दाखव. आपल्या गांवांत हल्लीं फटाक्यांचं महत्त्व फार

वाढलं आहे ! आपल्या खेडेगांवचा उत्तम फटाका म्हणजे 'फटुकफळी.' हा फटाका कुणालाहि ऐकायचा नाहीं. खर्च नको व आगीचा धोकाहि नाहीं.

आणि हो माझ्याबरोबर बाबूकाकांचा सुरेश येणार आहे. त्याच्या-करितां मुद्दाम एक आपलं खेडेगांवचं पिस्तुल—'फटुकफळी'—करून ठेव. कळावं. हे आशीर्वाद.

तुझे
नाना

घारूनें पत्र वाचून होतांच अधीरतेनें 'बालानंद' मासिकाचा अंक उघडून पहाण्यास सुरवात केली.

'बालानंद' मासिकांतील गाणीं, गोष्टी, शास्त्रीय व इतर माहिती आणि मधून मधून विखुरलेलीं सुंदर चित्रें पाहून सदर अंक घारूस फार फार आवडला.

घारूच्या हातांत अंक पाहून शाळेंतील इतर बालगोपालांनीं घारूच्या भोंवतीं गराडा घातला होता. तेहि अंक पहाण्यांत गुंग झाले होते.

"घाल्रू, आम्हाला दाखवाशिल् काले त्यांतल्या गोत्ती वाचून !" बोबडा शिवा घारूकडे पहात म्हणाला.

"हो ! हो ! जरूर दाखवीन हं वाचून !" घारूनें ठसक्यांत उत्तर दिलें.

"घारू, आपण रोज परवाचा म्हटल्यावर वाचूं यांतील गोष्टी" जौऱ्या म्हणाला.

"अरे, रात्रीचें टुक्याच्या प्रकाशांत काय दिसणार ! तेव्हां आपण रोज दुपारीं मारुतीच्या देवळांतच वाचूं यांतील गोष्टी." घारूनें खुलासा केला.

दुसऱ्या दिवसापासून शाळा सुटल्यावर जेवण आटोपून सारे बाल-गोपाल देवळांत जमायचे आणि नेमानें मासिकाचें वाचन करायचे.

* * *

## १२. बंदर–किनारा

दिवाळी जवळ आली. घारूच्या शाळेला उद्यापासून सुटी होती. घारूचे वडील–नाना–उद्यां मुंबईहून येणार होते. त्यावेळीं रेवदंडा बंदरांत बोट यायची. बोटींतून येणाऱ्या माणसांना उतरून घेण्याकरितां ज्यांच्या घरच्या बैलगाड्या होत्या, त्या बोट येण्यापूर्वी बंदरावर यायच्या.

घारूच्या घरीं बैलगाडी होती. म्हणून त्याची आज धामधूम उडाली होती. काकांनीं व त्यानें शेतीचें सामान वहाणारी चाकावरची मोठी साठी काढून चाकावर छकडीची साठी बसविली. गाडीला लावलेल्या तेलाच्या नळ्यांतील लोखंडी सळईनें त्यानें चाकांना तेल दिलें. मग त्यानें आपल्या आवडत्या मोत्या–पाखऱ्यांना सोडून तळ्यावर नेलें. त्यांचें पाणी पिऊन होतांच घारूनें त्यांचें अंग धुवून स्वच्छ केलें. त्यांना परत बेड्यांत आणून त्यांच्यापुढें पोटभर हिरवा चारा टाकला. त्यांचीं शिंगें तुकतुकीत दिसावींत म्हणून त्यानें त्यांना तेल लावलें.

त्याची एवढी धडपड कशासाठी माहीत आहे कां तुम्हाला ! उद्यां नानांच्या बरोबर सुरेश येणार होता ना ! त्याला आपले बैल चांगले दिसावे. त्यानें आपल्या बैलांची स्तुति करावी म्हणून !

काकांना मदत करायचा एवढा पुळका घारूला कां आला होता ? माहीत आहे का तुम्हाला ! त्याला गाडी हाकण्याचा फार फार नाद होता. मंत्रोपचार करून घेण्यास येणाऱ्या परगांवच्या गाड्या आपापल्या घरीं निघाल्या कीं गांवशिवेपर्यंत तो त्यांच्या गाड्या नेहमीं घेऊन जायचा. बाबांचा नातू ! मग त्याला कोण मज्जाव करणार ?

आपले सारे सारे उद्योग सोडून आज तो काकांना मदत करीत होता. याचें कारण काकांनीं खूष होऊन आपल्याला उद्यां गाडी हाकायला द्यावी, असें त्याच्या मनांत होतें. म्हणून तो आज काकांच्या पुढें पुढें करीत होता. शेवटीं त्याच्याच्यानें राहवलें नाहीं.

“ काका, उद्यां गाडी मला हाकायला द्याल का हो ? ” विनवणीच्या सुरांत घारूनें विचारलें.

“ हो देईन कीं ! ” काकांनीं संमति दिली.

काकांची संमति मिळतांच आणखी उरलीं सुरलीं कामें त्यानें झटपट करण्यास सुरवात केली. घारूनें मुद्दाम तयार केलेली पराणी—टोंकदार खिळा बसविलेली काठी—बेड्याच्या पारऱ्यांत लपवून ठेवलेली काढून त्यानें गाडींत नेऊन ठेवली. चार भाताच्या गुंड्या सोडून त्यानें गाडींत सारख्या अंथरल्या. त्यावर एक घोंगडी टाकून बसण्याकरितां छानशी गादी तयार केली.

घारूचीं वरील कामें होईतों संध्याकाळ झाली. राम, शिवा, भिवा, गौऱ्या, जौऱ्या नेहमींप्रमाणें परवाचा म्हणायला अंगणांत जमले.

आज परवाचा म्हणण्याकडे घारूचें मुळींच लक्ष नव्हतें. त्याचे मनां-तल्या मनांत बेत चालले होते. उद्यां पहाटे आपण जागें कसे होणार ? पांखऱ्याला कोणत्या बाजूला जोडावें म्हणजे तो अधिक जलद पळेल ? मोत्याला कोणत्या बाजूस जोडावें ? आंत कीं बाहेर ? ( आंत—हाकणाराच्या उजव्या बाजूस ) मध्येंच एकादी छकडी भेटली तर तिची बाजू आपले पांखऱ्या, मोत्या काढतील का ? इ. इ. बेत त्याच्या मनांत चालले होते.

कशीबशी एकदाचा परवाचा संपला. आत्या, आजींच्या लक्षांत आज घारूचें लक्ष नाहीं हें आलें होतें. पण आज त्या कांहींच बोलल्या नाहींत.

" बाबुल्यांनो, उद्यां परवाचा म्हणायला सगळे या हं ! उद्यां नाना येणार आहेत. तेव्हां कांहींतरी खाऊ उद्यां नक्की मिळेल ! " आत्यांनीं सर्वांना बजावून सांगितलें.

" घारू, उद्यांपासून आपल्या शाळेला सुटी आहे. येशील कां गुरें घेऊन रानांत ! " रामनें उत्सुकतेनें घारूकडे पहात म्हटलें.

" अरे, तो कसला उद्यां येणार ! तो जाणार आहे बंदरावर गाडी घेऊन नानांना आणायला ! " काकांनीं खुलासा केला.

" उद्यां गाडी मी हाकणार ! हो किनयी काका ! " सर्व सोबत्यांकडे पहात घारूनें जणुकाय गाडींतच बसल्याची ऐट आणीत म्हटलें.

" रामू, ( घारूचे चुलते ) घारूच्या हातांत गाडी देऊं नकोस हो ! करील कुठें तरी उलटी सुलटी ! " आत्यांनीं भुवया चढवीत आपल्या भावाला सांगितलें.

" अग माई, ( घारूच्या आत्यांना सारे ' माई ' या टोपण नांवानें हाका मारीत ) घारू आतां कां लहान आहे गाडी उलटी करायला ! तो उत्तम गाडी हाकतो हें मला माहीत आहे. " काकांनीं घारूची बाजू घेत म्हटलें.

दुसऱ्या दिवसाची पहाट झाली. काका उठले. त्यांनीं कंदील लावला. तोंच घारूहि जागा झाला. घारूची झोप म्हणजे कुंभकर्णाची झोप ! पण आज पहा त्याला कशी जाग आली ती ! मनापासून गोष्ट करायची असली कीं, मुलें आपोआप जागीं होतात. त्यांना हाक सुद्धां मारावी लागत नाहीं. पण हेंच अभ्यासाकरितां उठायचें असलें कीं, दहा वेळां हाका मारूनहि त्यांना जाग यायची नाहीं ! कारण अभ्यास म्हणजे त्यांना काम—ओझें—वाटतें. तो त्यांना जेव्हां खेळ वाटेल तेव्हां तीं आपोआप जागीं होतील. व मगच त्यांच्या कडून खूप खूप अभ्यास होईल.

तोंड धुणें झालें. काकांनीं चहा घेतला. घारूला परत घरीं यायला तीन चार तरी सहज वाजणार म्हणून आत्यांनीं त्याच्याकरितां केलेलीं पानगीं त्यानें खाल्लीं व निरसें दूधहि तो प्याला.

घारूनें मग मोत्या, पाखऱ्यांना गाडीला जोडलें. तो गाडींत बसला. डाव्या हातांत त्यानें निवळ्या धरल्या, उजव्या हातांत त्यानें पराणी घेतली. इतक्यांत काकाहि गाडींत येऊन बसले आणि गाडी सुरू झाली.


गाडी हाकायला काका बसले कीं मोत्या, पाखऱ्या रेड्यांच्या वेगानें चालायचे. त्यांनीं कधीं चुकून एकादी पराणी मारली तर तेवढ्यापुरतें जरा धावायचे कीं पुन्हा आपले रेड्याच्या चालीनें चालायला लागायचे ! पण आज घारूच्या हातांत निवळ्या आलयाचें पहातांच मोत्या, पांखऱ्या पाखराप्रमाणें निघाले. घारू गाडी हाकायला बसला कीं बैल वेगानें चालतात हें काकांच्याहि लक्षांत आलें होतें.

वाटेंत कुणाची गाडी भेटली कीं त्या गाडीच्या पुढें आपली गाडी काढायची घारूला घाई व्हायची. अलिबाग तालुक्यांतील गाडीवान गाडी पुढें गाडी सहसा जाऊं द्यायचे नाहींत. अर्थात ज्याची जोडी अधिक वेगानें जाईल त्याची सरशी व्हायची. घारूच्या पुढें अशीच एक छकडी गाडी चालूं लागली. अलिबाग तालुक्यांतील बैल सुद्धां गाडीच्या मागें चालायला तयार नसतात. न हाकलतां मोत्या पाखऱ्यांची पुढें जाण्यासाठीं धडपड सुरू झाली होती. वाट अरुंद असल्यानें घारूनें त्यांच्या निवळ्या आवरून धरल्या होत्या. इतक्यांत रुंद रस्ता आला. घारूनें मोत्या—पांखऱ्याला एकेक पराणी मारून सूऽऽऽ सूऽऽऽ करण्यास सुरवात केली. त्या बरोबर पाखऱ्या-मोत्यानें एकदम जोर केला व ते जोरानें चौखूर पळूं लागले. पुढचा

गाडीवालाहि कांहीं कमी नव्हता त्यानेंहि आपल्या बैलांना दोन दोन पराण्या मारून गाडी जोरांत हाकलली.

शेवटीं थोड्याच वेळांत घारूच्या मोत्यापांखऱ्यांनीं पुढच्या बैलांवर मात करून पुढच्या गाडीला मागें टाकलें व मग ते दुडक्या चालीवर चालूं लागले.

घारूनें तुच्छतेनें मागच्या गाडीवानाकडे पाहिलें आणि "हो, हो," करीत त्यानें आपली गाडी एका वडाच्या झाडाखालीं उभी केली. मोत्या–पाखऱ्यांच्या पाठीवर त्यानें एकेक शाबासकी म्हणून जोरानें थाप मारली आणि तोहि जरा गाडीच्या खालीं उतरला.



पुढचा गाडीवाला मनांतल्या मनांत "बैल असावे तर असे !" असे पुटपुटत आणि मोत्या–पाखऱ्यांवरून नजर फिरवीत पुढें निघून गेला.

मघाशीं पुढें असलेल्या गाडीस मागें टाकतांना पाखऱ्या मोत्यांनीं जी दौड मारली त्यावेळीं त्यांनीं घारूवर शेपटांच्या चौऱ्या ढाळत शेणाचा अभिषेक करावयास सुरुवात केली. त्यामुळें त्याच्या अंगावर कपड्यांवर शेण शिंपडलें गेलें. बैलांना थोडा विसावा मिळावा आणि शेणानें भरलेलें अंगहि धुवावें म्हणून त्यानें जरा गाडी उभी केली. त्यानें सर्व अंग स्वच्छ केलें. बैलांना पाणी पाजलें व गाडी पुन्हा सुरू झाली.

हां हां म्हणतां गाडी चार मैलांचें अंतर तोडून चौलजवळ आली. नुकतांच सूर्योदय होत होता. चौल म्हणजे पोफळा माडांचं आगर. अष्टागरांतील सृष्टिसौंदर्यानें नटलेलें एक गांव.

चौल गांवाजवळ शिरण्यापूर्वींच घारूच्या कानांवर माडांना शिंपण करणाऱ्या राहाटाचें गों ऽ ऽ ऽ गों ऽ ऽ ऽ, असें गोड गोड गाणें अस्पष्ट पडूं लागलें. सकाळच्या वेळचें हें राहाटाचें गोड गाणें घारूला फार आवडायचें म्हणून निवळया ओढून त्यानें गाडीचा वेग कमी केला. इतक्यांत त्याची गाडी चौल गांवांत शिरली.

दोन्ही बाजूला माडा पोफळांचीं उंच उंच झाडें, माडा पोफळांच्या मधून मधून आंबा, फणस, शिताफळ, पपनस, इ. फळझाडं, बकुळ, पारिजातक, चाफा इ. फुलझाडें आणि त्यामधून गाडीरस्ता. या रस्त्यानें पहाटेचें रहाटांचें गोड गोड संगीत ऐकत जाणें घारूला आवडायचें. तो एकाग्र चित्तानें रहाटांचें हें गोड संगीत ऐकत होता. बैल दमल्यामुळें अगदीं संथपणें चालले होते.

संगीत ऐकतां ऐकतां त्याची नजर सहजच माडांच्या शेंड्याकडे गेली. सूर्याचीं कोंवळीं उन्हें माडांच्या शेंडयावर पडल्यानें माडांचे शेंडे सोन्याच्या रसांतून बुडवून काढल्यासारखे दिसत होते. काल संध्याकाळपासून सूर्यकिरणें न मिळाल्यानें माड जणूकाय अधाशाप्रमाणें सूर्यकिरण पीत आहेत असें वाटत होतें. सोनेरी ठिपक्यांची रांगोळी काढावी तशी रांगोळी रस्त्याच्या मधून मधून सूर्यकिरणांची काढली आहे असें वाटत होतें. एकाद्या फुलझाडाजवळून गाडी जाऊं लागली कीं फुलांचा मंद गोड वास यायचा. अष्टागरांतून वारा सतत अत्तर लावून हिंडतो.

शहरांतून शांत वेळीं हिंडावयास जातांना एकाद्या विशिष्ट ठिकाणचें गाणें रेडिओ जवळ आला कीं मोठ्यानें ऐकूं येतें. त्या घरापासून आपण जसजसें दूर दूर जावें तसतसे गाण्याचे सूर अस्पष्ट ऐकूं यावेत; आणि त्याच स्टेशनचें गाणें पुढील घरांत सुरू असेल तर गाण्याचे सूर अधिकाअधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागावेत तशीच गंमत अष्टागरांतून सकाळ संध्याकाळीं जातांना पहावयास सांपडते. रहाटाचें गोंऽऽऽ, गोंऽऽऽ, असें संगीत ऐकत पुढें पुढें जावें तों तों पहिल्या रहाटाचे संगीताचे स्वर लुप्त होत व पुढच्या रहाटाचें संगीत अधिकाअधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागे.

पहाटेपासून रहाट ओढल्यानें रहाटास जुंपलेले बैल थकल्यामुळें हळू चालूं लागत कीं गोंsss, गोंsss, असा निघणारा आवाज संथ होई. पण शिपणें करणाऱ्याच्या लक्षांत रहाटाच्या आवाजावरून बैल हळूं चालला आहे हें लक्षांत येऊन पाणी मोडतां मोडतां तो बैलाचें नांव घेऊन–चक् चक् असा ओरडूं लागे. कीं लगेच बैल जोरांत चालूं लागल्यानें गों s s s, गों s s s या आवाजाची गति वाढूं लागे.

बागमळे संपले. रहाटांचें संगीत संपलें. गाडीचा खडखडाट थांबला. आणि एकदम बंदरकिनारीच्या पुळणींत गाडी घुसली. तेथें बैल न थांबवतां नेहमींच्या एका हॉटेलजवळ थांबवले. काका गाडींतून खालीं उतरले.

" अरे घारू, तुला कांहीं खायचंय् का ! " काकांनीं घारूला हाक मारून विचारलें. तेव्हां कुठें घारू संगीताच्या गोड निद्रेंतून जागा झाला.

" मला कांहीं नको. तुम्ही या चहा पिऊन ! " असें म्हणत घारूनें गाडी सोडली. बैलांना घेऊन तो पाण्यावर गेला. बैल पाणी पिऊं लागले. त्याची शीळ सुरू झाली. शीळ घातली कीं बैल शांतपणें पोटभर पाणी पितात. पराण्या मारून ठिकाठिकाणीं आलेले रक्ताचे ओघळ त्यानें पुसून काढले. कारण नाना बैलांना पराणी मारण्याच्या विरुद्ध होते. त्यांना दिसूं नये हा उद्देश त्याचा होता. बैलांच्या पुढें त्यानें दोन दोन पेंढ्या सोडल्या.

काकांचा चहा पिऊन झाल्यावर ते बाहेर आले. " काका, मी जरा बंदरावर जाऊन बोट आली आहे कां पाहून येतों. " असें घारूनें काकांना सांगितलें व तो बंदराकडे चालूं लागला.

सागराच्या किनाऱ्यावर जाऊन गुडघ्याइतक्या पाण्यांत उभे राहून लाटांची मजा पहाणें कुणाला आवडणार नाहीं ? घारूनें तसेंच करावयाचें ठरविलें. पुळण तुडवीत तो झपझप जात होता. सुरवातीला त्याला कोरडी पुळण ( वाळू ) व नंतर ओली पुळण लागली. लहान लहान जलचर किडयांनीं, चिंबोऱ्यांनीं पुळणींत बिळें पाडून त्या भोंवतीं वाळूच्या बारीक बारीक गोळ्यांची सुंदर नक्षी काढली होती. ते आपल्या घरट्याच्या भोंवतीं इकडे तिकडे आनंदानें फिरत होते. पण माणसाच्या पावलांची चाहूल लागतांच लहान लहान प्राणी, चिंबोऱ्या जीव घेऊन तुरुतुरू पळत आणि पुटुपुटू आपापल्या बिळांतून भीतीनें लपून बसत.

घारू शेवटीं गुडघाभर पाण्यांत जाऊन लाटांची मजा पाहूं लागला. मध्येच तो सागराकडे दूरवर पाहूं लागे. पहातां पहातां त्याला खूप दूर अंतरावर काळा धूर दिसला. त्यानें धांवत जाऊन काकांना बोट आल्याची वर्दी दिली. आणि पुन्हां तो पाण्यांत येऊन उभा राहिला.

बोटींतून निघणारा धूर अधिकाधिक स्पष्ट दिसूं लागला. मग क्रमानें बोटीचा बंब, मग खालचा भाग दिसून हां हां म्हणतां बोट जवळ आली. धाड्, धाड्, धाड् करीत तिनें आपला नांगर टाकला. आणि भोंऽऽऽ भोंऽऽऽ असा लांबच लांब कर्कश आवाज रेवदंडा खाडींत घुमून गेला. बोटींत जाणाऱ्या आणि बोटींतून येणाऱ्या माणसांचीं एकच धांदल उडाली.

पडाव किनाऱ्याला लागला. नाना आणि त्यांच्याबरोबर घारूच्याच वयाचा एक मुलगा साहेबी पोषाक करून येत होता. घारूनें धावत जाऊन नानांच्या हातांतील सामान घेतलें.

घारूनें सुरेशला व सुरेशनें घारूला पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें. त्यांची ओळख झाली. घारूनें धावत जाऊन गाडी जोडली. गाडीच्या पुढच्या बाजूस घारू व सुरेश व मागच्या बाजूस नाना व काका बसले. बालगोष्टी गाडीच्या पुढच्या बाजूस आणि थोरांच्या गोष्टी मागच्या बाजूस सुरू झाल्या.

बैल घरच्या ओढीनें वेगानें चालले होते. सुरेश कोंकणच्या सृष्टि-सौंदर्याचें निरीक्षण करण्यांत आणि गप्पांत रंगून गेला होता.

थोरामोठ्यांच्या गप्पांत मल्याण गांव कधीं आलें तें कुणालाच कळलें नाहीं. पाखऱ्या मोत्यांची जोडी चिंचेखालीं घारूच्या घराजवळ थांबली आणि बाल-थोर गप्पेच्या तंद्रींतून जागे झाले.

* * *

## १३. फटुकफळी

नाना मास्तर आले. नाना मास्तर आले. एक गांवकरी दुसऱ्याला सांगत होता. साऱ्या गांवकऱ्यांचे नाना मास्तर आवडते होते. दारावरून जातां येतां गांवकरी नानांना हाका मारीत. व कुशल विचारून पुढें जात.

संध्याकाळ झाली. परवाचा म्हणायला मुलांची अंगणांत आज अगदीं गर्दी झाली होती. सुरवातीला—"शुभं करोति", 'मनाचे श्लोक' तुका-

रामाचे कांहीं अभंग म्हणून झाले. नंतर परवाचा म्हणायला सुरवात झाली. परवाचा म्हणून झाल्यावर नानांनीं बालगोपालांना कांहीं थोरामोठ्यांच्या गोष्टी सांगितल्या. आत्यांनीं सर्वांना खाऊ दिला.

"थांबा !" म्हणून सुरेशनें आपल्या बॅगमधून नळे, चंद्रज्योति, आपटबार, साधे व इलेक्ट्रिक फटाके इ. दारूकाम काढून पुढें ठेवलें. "यांतील आपण आतां कांहीं उडवूं या !" असें सुरेश म्हणाला.

"अरे सुरेश, असलें दारूकाम खेड्यांत उडविणें धोक्याचें असतें" घारूनें सुरेशकडे पहात म्हटलें.

"यंदा आम्ही सर्वांनीं फटाके उडवायचे नाहींत असें ठरविलें आहे." रामनें फटाक्यांबद्दल अधिक खुलासा करीत म्हटलें.

"परवा आलेलें नानांचें पत्र वाचून आम्ही बालगांवकी भरविली आणि तींत यंदा कोणीहि फटाके वाजवावयाचे नाहींत असें ठरविलें." भिवानें गांवकींतील ठराव सांगितला.

वरील संवादाकडे नानांचें बारकाईनें लक्ष होतें. ते मध्येंच म्हणाले— "बाळांनो, तुम्ही बालगांवकींत चांगला ठराव पास केलात !"

"अहो नाना, तुमचें पतर् आम्हाला घाडूनें शाळेंत वाचून दाखविलें." बोबडा शिवा मध्येंच म्हणाला.

"तुमचें पत्र वाचून झाल्यावर माळी गुरुजींनींहि तुम्ही फटाके उडवूं नका असें सांगितलें." गौऱ्या नानांकडे पहात म्हणाला.

"कायरे घारू, मग यंदाची दिवाळी तुम्ही फटक्यांशिवाय कशी साजरी करणार ? आमच्या मुंबईंत आम्ही कानठळ्या बसेतों फटाके उडवतों." सुरेश सर्वांकडे पहात म्हणाला.

"फटाक्यांशिवाय दिवाळी साजरी होत नाहीं असें कोण म्हणतो ? करंज्या, लाडू, चकल्या, कडबोळीं खायला मिळालीं म्हणजे झालें ! आमच्या खेड्यांतून जिकडे तिकडे गवत, पेंढा पडलेला असतो. त्याला फटाक्यामुळें आग लागण्याचा फारच धोका असतो. परवाच्या पत्रांतून नानांनीं आम्हाला खेड्यांतून फटाके उडविणें धोक्याचें असतें असें कळविल्यावरून आम्ही यंदा फटाके न उडविण्याचें ठरविलें आहे. त्यांची केप ( टिकल्या ) उडविण्यास परवानगी आहे. ते केप मात्र आम्ही उडविणार." रामनें फटाक्यांबद्दल खुलासा केला.

"आणि हो! आमचें खेड्यांतील पिस्तुल तूं पाहिलें नाहींस! त्यांतून आम्ही फटाफट् बार काढतों कीं!" घारूनें कोंकणच्या अस्सल फटाक्याची माहिती दिली.

"खेड्यांतील पिस्तुल! तें कसें काय असतें बोवा?" सुरेशनें भुवया वर चढवीत म्हटलें.

"अरे, या पिस्तुलाला आम्ही 'फटुकफळी' म्हणतों. परवाच्या पत्रांत नानांनीं तुझ्याकरितां एक फटुकफळी तयार करावयाला मला सांगितली होती. पण मी विसरूनच गेलों. आतां उद्यां तुला करून देईन हं!" घारू म्हणाला.

"अरे सुरेश, तुझ्या बॅगेंत फटाके असतील अशी मला मुळींच कल्पना नव्हती. मला अगोदर कळतें तर बरोबर फटाके घेऊं नकोस असें मीं सांगितलें असतें. आतां सुरेशनें आणलेले फटाके होळीच्या भाटावर माझ्या देखरेखीखालीं तुम्हाला उडवायला मी परवानगी देतों. सर्वांनीं रोज जेवण झाल्यावर होळीच्या भाटावर जमायचें. मी आलों कीं मग सुरेशनें फटाके उडवायला सुरवात करायची." असें सांगून नानांनीं बालगोपालांना जेऊन येण्यास सांगितलें.

रात्रीं बालगोपाल होळीच्या भाटावर जमा झाले. नाना, घारू निघाले. सुरेशनें आपल्याबरोबर फटाके घेतले. नानांनीं निरनिराळ्या प्रकारचें दारूकाम उडवायला सांगितलें. दारूकाम पाहून सर्वांना फार फार आनंद झाला व मग सर्व घरोबर गेले.

शहरांत लख्ख प्रकाशांत रात्रींचें वावरण्याची संवय झाल्यानें सुरेशला आज चुकल्यासारखें होत होतें. गप्पा मारतां मारतां त्याला व घारूला केंव्हांच झोंप लागली.

* * *

"घारू, मला संडास दाखव रे!" सकाळ होतांच सुरेश म्हणाला.

"चल, दाखवतो संडास तुला!" हातांत एक तपेली घेऊन सुरेशच्या हातांत एक तपेली देत घारू म्हणाला.

घारूच्या मागें सुरेश चालूं लागला. थोडें अंतर चालतांच "कायरे, कुठें आहेत तुमचे संडास?" सुरेशनें विचारलें,

६७६५०
ग्रि. स. ग्रा.

घारू म्हणाला—

" तूं म्हणशील तेथें ! इथें म्हणालास इथें ! पुढें म्हणालास पुढें ! "

सुरेश म्हणाला—

" इथें कुठें दिसत नाहींत ते ! "

घारू म्हणाला, " कां तुला घाई लागली कां ? "

सुरेश म्हणाला, " छे ! तसें कांहीं नाहीं ! "

बोलत बोलत ते गुरभाटांत पोहोंचले.

सुरेश इकडे तिकडे पहात म्हणाला—

" कायरे घारू, अजून तुमचे संडास कोठें दिसत नाहींत ते ! "

घारू म्हणाला—

" आमच्या खेड्यांत नित्य नवे संडास असतात. ज्याला ज्याला ज्या संडासांत बसावेसें वाटेल त्यानें त्या संडासांत खुशाल बसावें. "

सुरेश म्हणाला—

" हं ! आलें माझ्या लक्षांत ! आपल्याला उघड्यावर नाहीं व्हायचें बोवा शौचाला ! "

घारू म्हणाला—

" तो पहा मोठा दगड दिसतो ना ! त्याच्या मागें बस ! मी जरा पुढें जाऊन येतों. "

थोड्या वेळानें दोघेहि परत घरीं येण्यास निघाले. घारूनें समोरच पडलेली एक रानशेणी उचलून घेतली.

" काय सुरेश, आमच्याकडचे संडास किती स्वच्छ आहेत ? घाणवूण अजिबात नाहीं ! " घारू म्हणाला.

" हो आहेत खरे स्वच्छ ! पण आपल्याला असल्या संडासांत बसायची संवय नाहीं ! पण कायरे हें शेण कशाला घेतलेंस ? " सुरेश रानशेणीकडे बघत म्हणाला.

" अरे, याला रानशेणी म्हणतात. आमच्या आजी म्हणतात शेतकऱ्यांनीं जातां येतां काम करावें. आम्ही शौचाला जातांना सुद्धां रिकामे जात नाहीं. जातांना गोअर ( केरकचरा ) शेतावर घेऊन जायचा व परत येतांना शेण, रानशेणी, गवताचा भारा कांहींतरी घरीं घेऊन यायचें. आम्ही शेतकरी असें काम करतों म्हणून तर तुम्ही चैनींत शहरांत राहतां. "

घारूनें खुलासा केला.

" खरोखरच तुम्हा शेतकऱ्यांचे आमच्यांवर मोठे उपकार आहेत ! " सुरेशनें दुजोरा देत म्हटलें.

बोलतां बोलतां घारूच्या मागील दारची विहीर आली. विहिरीच्या जवळ केळीं, कागदी लिंबू, आंबा, चिंच इ. ची दाट झाडी होती. मधून मधून पोकळ व भरीव बांबूंचीं बेटेंहि होतीं.

" अरे वा ! तुमच्याकडे बांबूंचीं बेटेंहि आहेत वाटतें ! " सुरेश बांबूंकडे पहात म्हणाला.

" बरी आठवण केलीस. अरे, तुला आमच्या खेडेगांवचें पिस्तुल दाखवायचंय ना ! चल, आपण दोन पिस्तुलं तयार करूं ! " बांबूच्या बेटाकडे जात घारू म्हणाला.

ते दोघेहि एका पोकळ बांबूच्या बेटाजवळ आले. पिवळ्या झालेल्या एका बांबूचे बांबू वाकवून घारूनें शेवटचें टोंक तोडलें.

पोकळ बांबूच्या वीत दीड वीत लांबीच्या दोन फुंकण्या तयार केल्या. नंतर त्यांत सायकलीच्या पंपांत मूठ असलेली एक सळई असते ना तशी सळई भरीव बांबूची मूठ असलेली त्यानें तयार केली.

" सुरेश, हें बघ आमचें कोंकणचें पिस्तुल. " सुरेशच्या हातांत देत घारूनें म्हटलें.


फुंकणीसारख्या पोकळ भागाचें आणि मूठ असलेल्या भरीव सळईचें निरीक्षण करीत तो म्हणाला,

" हें का पिस्तुल ! पण हें वाजणार कसें ? "

" थांब हं तुला दाखवतों " असें म्हणून घारूनें एका झाडाच्या पाल्याचा गोळीसारखा भाग करून तो त्या पोकळ नळींत ठासून बसविला. मग ती गोळी त्यानें मूठ असलेल्या सळईनें नळीच्या पुढच्या तोंडाकडे ढकलून ठेवली. नंतर पाल्याची दुसरी गोळी करून त्यानें ठासून तोंडावर बसविली.

" आतां बघ हं आमचं पिस्तुल कसं उडतं तें ! तुझा हात लांब कर जरा ! " घारू म्हणाला.

सुरेशनें हात लांब करून तळहात घारूकडे होईल असा धरला. घारूनें दांडा असलेली सळई पुढें रेटली मात्र !



'फट्' असा आवाज झाला, नळीच्या बाजूचा पानांचा बोळा तळहातावर जोरांत आदळला. सुरेशच्या हाताची थोडी चुरचूर झाली.

"वा! फारच छान आहे हें कोकणचें पिस्तुल! मलां फार आवडलें." घारूच्या हातांतील फटुकफळी घेत सुरेश म्हणाला.

सुरेशनें पाल्याची गोळी फटुकफळींत दांड्यानें जोरांत पुढें रेटली. त्याबरोबर 'फाट्' असा आवाज झाला. आणि पुढचा बोळा जोरांत पुढें उडाला. आणि रेटलेला पुढें जाऊन नळींत बसला. सुरेशला या फटुकफळीची फारच गंमत वाटली.

घारूची व सुरेशची फटुकफळी पाहून घारूच्या बालगोपालांनींहि फटुकफळ्या तयार केल्या. या देशी पिस्तुल धारण करणाऱ्या बालफलटणी एकमेकांवर गोळ्या झाडूं लागल्या—

"फाट्—फाट्—फाट्!"

* * *

## १४. वनदेवतेचा खाऊ

सुरेशला घारूचें मल्याण गांव फार फार आवडलें. तेथील हवा, पाणी, निसर्ग पाहून त्याला या गांवीं पुन्हा पुन्हा यावें असें वाटूं लागलें, पण शहरांतून येतांजातां चॉकोलेट, बिस्किटें खायची, अधूनमधून हॉटेलांतून

भजी, चिवडा, मिसळ खायची त्याला संवय असल्यानें त्याला कल्याणला आल्यापासून चुकल्याचुकल्यासारखें होत होतें.

उन्हें खालीं उतरूं लागलीं कीं, ते रोज निरनिराळ्या ठिकाणीं फिरावयास जात. शाळेला सुटी असल्यानें घारूचे बालसवंगडीहि त्यांच्याबरोबर असायचे.

" घारू, खेडेगांवांतून हॉटेलं नसतात. मग तुम्हांला चैन तरी कसं पडतं ? " सुरेश म्हणाला.

" अरे, खेड्यांतील लोकांजवळ पैसे नसतात तुमच्या शहरच्या लोकांसारखे ! तुमच्याजवळ खिशांत पैसे खुळखुळतात म्हणून तुम्हाला बिस्किटं, चॉकोलेटं खायला सुचतं. पण आमच्या खेड्यांतून आम्हाला विना पैसा आमची वनदेवता खूप खूप खाऊ देते. " घारू अभिमानानें बोलत होता.

" वनदेवता खाऊ देते ? तो कसा काय बुवा ? " आश्चर्यानें सुरेश म्हणाला.

"उन्हाळ्याच्या दिवसांत आम्ही रानांत जाऊन करवंद, बाकाळं, चारबोरं खातो. सावरीच्या कापसाच्या बिया खातो. हा खाऊ आम्हाला वनदेवता फुकट देते. हा खाऊ ज्यांना खाण्याची इच्छा होईल त्यांनीं तिच्याकडे खुशाल जावें. ती हसतमुखानें आपल्याजवळचा खाऊ पोटभर देईल तुम्हाला. आंब्यांच्या दिवसांत आंबे सुद्धां आम्हांला फुकट मिळतात. रानांतले काहीं रायवळ आंबे तुमच्या हापूस, पायरीच्या तोंडांत मारतील.

" थोड्याफार पैशानें कलिंगडें, ताडगोळे, मोहाचा नारळ, सिताफळ, शहाळीं इ. फळफळावळेंहि मिळतील. "

" अले घालू, सुलेशला खौसं कुथं माहीत आहेत ! " बोबडा शिवा मध्येंच म्हणाला.

" हो खरंच ! आमच्याकडे हें सावरीचं झाड आहे ना ! तसं एक झाड आहे. त्याला खवसाचं झाड म्हणतात. त्याच्या पानांच्या दोनहि बाजूला एकेकच चवळीच्या आकाराचा एक भाग असतो. तो आम्ही खातों. झाडाचीं पानं वाळलीं कीं आम्ही दगड मारतों. कीं खळ्‌कन् पानं गिरक्या घेत घेत खालीं येतात. मग आम्ही त्याचा चवळीसारखा भाग असतो ना, तो मिटक्या मारीत खातों. अगदीं बदामासारखा लागतो.

" हिंवाळ्याच्या शेवटीं शेवटीं आम्ही एकामेकांच्या शेतावर जाऊन पोपटीच्या शेंगा खातों. देशावर हुरडा खाण्याची एक विशेष लज्जत असते ना ! तशीच आमच्या कोंकणांत पोपटीच्या शेंगांचीं एक वेगळीच लज्जत असते.

" वालाच्या शेंगा तयार झाल्या कीं आम्ही शेतावर जातों. मग वालाच्या शेंगा काढतों. त्या एका मडक्यांत घालून शेतावरच त्या गवतांत भाजतों व मग तिखट, मीठ लावून ओल्या नारळाच्या खोबऱ्याबरोबर मिटक्या मारीत खातों. तुला आतां देतां येणार नाहींत. आत्താशीं कुठं वाल लावलाय.

" याशिवाय तुम्ही ज्याला नांवें ठेवतां ना, ते कडवेवाल भाजून आम्ही कुडुम् कुडुम् करीत मिटक्या मारीत खातों. आमच्या घरच्या भाताचे पोहे आमच्या घरांतून असतात. तें आमचें आवडतें खाद्य आहे. "

गप्पा मारीत फिरतां फिरतां संध्याकाळ झाली. पक्ष्यांचे थवेच्या थवे आपआपल्या घरट्यांकडे झेपावत होते. नुकत्याच व्यालेल्या गाईंना आपल्या छबड्याची आठवण झाल्यानें त्या हंबरत होत्या. शेतीच्या कामाला गेलेले शेतकरी आनंदानें रेंगाळत घराकडे परतत होते.

घारू व घारूचे बालमित्र तळ्याजवळ आले. रामचें लक्ष तळ्यांतील घांगुराकडे, उमललेल्या कमळाकडे गेलें.

" आणि घारू, सुरेशला घांगुर मिळतात तें सांगायचें राहिलेंच कीं ! " राम म्हणाला.



" घांगुर ! म्हणजे काय ? " सुरेशनें आश्चर्यानें विचारलें.

" तीं तळ्यांतील कमळं बघ. फुलाची वाढ पूर्ण झाली कीं मग त्याच्या खालीं एक फळ लागतें त्याला घांगुर म्हणतात. तोही आम्ही खातों. घांगुर मात्र या दिवसांत तुला मिळतील. "

" घारू, आपण उद्यां दुपारीं घांगुर काढूं या का ? म्हणजे मला पोहायलाहि मिळेल आणि तुमच्या वनदेवतेच्या खाऊची लज्जतहि चाखायला मिळेल. " सुरेशनें आपला बेत सांगितला.

इतक्यांत घारूचें घर आलें. " हातपाय स्वच्छ धुऊन देवाला आणि वडील मंडळींना नमस्कार करून लौकर या हं परवाचा म्हणायला ! " घारूनें सर्वांना सांगितलें.

* * *

## १५. घारूनें वांचविलें

दुसऱ्या दिवशीं घारू, सुरेश व घारूचे बालमित्र दुपारच्या वेळीं " बालानंद " मासिकाचा अंक वाचीत होते. इतक्यांत सुरेशला कालच्या घांगुराची आठवण झाली.

" घारू, अरे आपल्याला आज घांगुर काढायचायत ना ! " सुरेश म्हणाला.

" अरे, घारू चल कीं रे, आपण सुरेशला तळ्यांतील घांगुर काढून देऊं ! " सारे एकदम म्हणाले.

घारू, सुरेश, राम, शिवा, गौऱ्या सारे सारे तळ्यावर गेले.

मल्याणचें तळें खूप खूप मोठें होतें. तळ्याच्या कांठावर आंबा, चिंच, बोरीची दाट दाट झाडी होती. तळ्याच्या मध्यावर निळीं, पांढरीं, तांबडीं कमळें वाऱ्यानें डोलत होतीं. कमळाच्या वेलांचीं वर्तुळाकार कडेनें कातरलेलीं पानें हिरव्यागार गालिचाप्रमाणें दिसत होतीं.

बालगोपालांनीं बोरीच्या झाडावर वाळत ठेवलेल्या लंगोट्या भराभर काढल्या. लंगोट्या नेसून झाल्यावर त्यांनीं धडाधड तळ्यांत उड्या टाकल्या.

खेड्यांतील मुलें धावण्यांत, पोहण्यांत, नेम मारण्यांत पटाईत असतात. राम सर्वांच्या पुढें गेला. त्यानें एक घांगुर हातांत घेऊन " ए सुरेश, हा घेरे

घांगुर ! ” म्हणत जोरानें त्याच्याकडे फेकला.

आज हवेंत गारठा होता. घारूची तब्बेत आज रोजच्या सारखी नव्हती. नाहींतर त्यानेंहि तळ्यांत उडी टाकली असती.

“ कायले सुलेश, तुला येतं का पोहायला ?” बोबड शिवा घारूकडे पहात म्हणाला.

“ हो, येतें कीं ! ” सुरेश म्हणाला.

तळ्यांत मधोमध एक तांबडें कमळ वाऱ्याच्या झुळकीनें ऐटीत डुलत होतें. त्याकडे बोट दाखवीत शिवा म्हणाला—

“ कायले, त्या ऽऽ, त्या ऽऽऽ, तांबव्या कमलापर्यंत तुला दाता येईल का ? ”

“ हो, हो ! न यायला काय झालें ! ” सुरेश म्हणाला.

घारूचे सारे मित्र पोहत होते, एकमेकांना पाण्यांत बुडवीत होते, कांहीं पाण्यांत शिवाशिवीचा खेळ खेळत होते. तें पाहून आणि बोबड्या शिवाची शंका दूर करावी म्हणून त्याला वाटलें आपण पोहावें.

“ घारू, आपण पण पोहूं चल कीं रे ! ” सुरेशनें आपलें मनोगत सांगितलें.

“ मी आलों असतें रे ! पण मला आज जरा बरं नाहीं. आणि थोडी थंडीही वाजते. ” घारूनें न येण्याचें कारण सांगितलें. आणि तो आठवल्यासारखें करून पुढें बोलूं लागला, “ सुरेश, तूंहि आतां पोहूं नकोस. कारण तुला कितपत येतें पोहायला हें मला माहीत नाहीं. तुम्ही विहिरींत बेडकासारखे डुबुक, डुबुक करणारे शहरचे लोक ! ”

शेवटीं सुरेशला राहवलें नाहीं. त्याला शिवानें एक लंगोटी दिली. तो ती नेसला. आणि त्यानें धाडकन् तळ्यांत उडी टाकली. पाण्यांतून वर येतांच तो तडक शिवानें दाखविलेल्या तांबड्या कमळाच्या दिशेनें हात मारूं लागला. सुरेशला तळ्यांत पोहायची संवय नव्हती. तळ्याचा अंदाज नव्हता.

लांबून पहाणाऱ्यालाहि सुरेश दमला असल्याचें कळून आलें असतें. वास्तविक अजून तो अर्धें अंतरहि तोडून गेला नव्हता. त्याला आपण दमलों हें कळलें होतें. पण घारूचे मित्र काय म्हणतील ? आणि बोबडा शिवा काय म्हणेल ? म्हणून तो तसाच पुढें पुढें जात होता. विहिरींत चार हात

मारले कीं आला दुसरा कांठ !. तसें का तळ्याचें आहे ? बरं, परत फिरावें तर तो कांठहि कांहीं जवळ नव्हता. आतां त्याचे पायहि कमळाच्या वेलांत गुरफटूं लागले. त्याचा दम सुटला, धीर खचला.

" मेलों ऽऽ, मेलों ऽऽऽ, मेलों ऽऽऽऽ, " असें तो ओरडूं लागला. त्याचा आवाज ऐकून तळ्यांत पोहणारीं पोरें घाबरलीं, व तींहि ओरडूं लागलीं.

" सुरेश बुडाला ! वाचवा ! वाचवा ! "

घारूनें सुरेशचा आवाज ऐकला. प्रथम त्याला काय करावें हें कांहीं सुचेना ! मग त्याला एक युक्ति सुचली. शेतांत म्हशी चरत असल्याचें त्यानें मघाशीं पाहिलें होतें. तो झटकन् उठला. जवळ पडलेली त्यानें एक शिपटी उचलली. तो धांवत शेतांत गेला. एका म्हशीला त्यानें तळ्याच्या दिशेनें झोडपण्यास सुरवात केली. म्हैस धपाधपा धांवत सुटली. मग तो टुण्कन् उडी मारून म्हशीवर बसला. आणि तिच्या पायावर आणखी शिपट्या मारूं लागला.

म्हशीला धावडवतच त्यानें तळ्यांत लोटलें. ती आतां चांगली पोहूं लागली. घारूनें तिला शिपट्या मारीत मारीत सुरेशकडे नेलें.



तो तळ्यांत शिरल्यापासून सुरेशला ओरडून सांगत होता—" घाबरूं नको ! मी आलों ! " सुरेशला धीर देत देत तो त्याच्याजवळ गेला. म्हशी-वरून उडी मारत तो म्हणाला, " सुरेश, या म्हशीवर बैस. "

सुरेश कसाबसा म्हशीवर बसला. तेव्हां त्याला हायसें वाटलें. घारूनें म्हशीच्या तोंडावर तडाका देऊन तिला परत फिरविलें. करतां करतां एकदाचा कांठ आला. सुरेश उडी टाकून खालीं उतरला.

" घारू, तूं होतास म्हणून मी आज वाचलों ! " सुरेश म्हणाला.

" मी होतों म्हणून नको म्हणूं ! ती चांदी होती म्हणून म्हण ! आणि तिचे पाय धर आधीं ! " घारू हसत हसत म्हणाला.

दोघेहि हसूं लागले. सुरेश जेव्हां मेलों, मेलों म्हणून ओरडत होता तेव्हां कांहीं मुलें " बुडाला ! बुडाला ! " करीत गांवाकडे धांवत गेलीं होतीं. त्यांची ओरड ऐकून गांवांतील लोक तळ्याकडे पळत सुटले. घारूचे नाना, आत्या, आई, बाबा धावत धावत येत होते.

घारू मागें व पुढें म्हशीवर बसलेला सुरेश तळ्यांत पाहून साऱ्यांच जीव भांड्यांत पडला.

आत्या पुढें होऊन म्हणाल्या—" बाबुल्यांनो, दुपारच्या वेळीं मोठें माणूस नसतांना कशाला आलात पोहायला ? "

" अहो, सुलेशला घांगुल घायचे होते ना ! म्हणून ! " बोबडा शिवा मधेंच म्हणाला.

" जळ्ळे घांगुर तुमचे ! एकाद्याचा जीव घेतील ! घांगुर खाऊन का पोटं भरणार आहेत ! " आत्या रागानें म्हणाल्या.

" सुरेश, तुला पोहायला घारूनें सांगितलें ना ! " नाना रागानें म्हणाले.

" अहो, पण मी त्याला...... "

त्याचें बोलणें पुरें व्हायच्या आंतच नाना रागानें म्हणाले—

" चूप ! कांहीं बोलूं नकोस ! आतां सुरेश बुडता तर माझ्या मानेशीं फास आला असता !—" घारूच्या अंगावर नाना गर्जले.

" अहो, पण यांत घारूचा कांहीं दोष नाहीं. " म्हणत राम पुढें झाला. त्यानें सारी सारी हकीकत जमलेल्या मंडळींना सांगितली. शेवटीं घारूची युक्ति रामनें अगदीं तिखट मीठ लावून सांगितली. ती ऐकून

साऱ्यांच्या तोंडून पुढील उद्‌गार सहजच बाहेर पडले,

"आज घारू होता म्हणून सुरेशचे प्राण वाचले."

* * *

## १६. गाढव स्वार

अलीकडे बरेच दिवस मल्याणच्या रहिवाशांना मारुतीच्या देवळांतील बद्‌ वाजणारी घंटा ऐकण्याची संवय पडली होती. पण आतां शाळा सुरू झाल्यापासून त्यांना मधून मधून दुसऱ्या घंटेचा खणखण आवाज ऐकूं येई. ती घंटा शाळेची होती.

मारुतीच्या देवळाजवळून जातांना आतां शाळेचें अस्तित्व चांगलेंच कळून येई. कधीं मुलें जोरजोरानें उजळणी म्हणतांना ऐकूं येई, तर कधीं मुलें खड्या आवाजांत कविता म्हणतांना ऐकूं येई. गुरुजी कांहीं कामा-निमित्त कुठें बाहेर गेले असतील तर मधमाशा गोंगावत एके ठिकाणाहून दुसरीकडे जातांना जसा आवाज येतो तसा आवाज येई. शाळा भरतांना, सुटतांना, चालू असतांना मुलांच्या या विविध आवाजानें आणि शाळेच्या घंटेच्या आवाजानें गांवांत एक प्रकारचें चैतन्य आलें आहे असें वाटायचें.

शाळेची मधली सुटी झाली कीं मुलांना कांहींतरी खाऊन मारुतीच्या देवळामागील झाडींत घारू नेहमी लौकर बोलावत असे. तीं तेथें जमलीं कीं त्यांच्या माकडचेष्टांना ऊत यायचा.

दुसऱ्या गांवीं आणि बाजाराला जाण्याची वाट देवळाजवळून असल्यानें मारुतीचे भक्तगण मारुतीरायाचें दर्शन घेतल्याशिवाय सहसा पुढें जात नसत. अशावेळीं त्यांच्याजवळ असलेलें सामान, पादत्राणें ते बाहेर ठेवीत असत. कधीं कधीं या वानर सेनेचें लक्ष आपल्याच जातभाईच्या दर्शनास येणाऱ्या भक्तांवर असायचें.

भक्तगणांनीं काढून ठेवलेलीं पादत्राणें लपवून ठेव, कुठें बाहेर ठेवलेल्या टोपलींत बेडूक, चिंबोरी, सरडा सोड, कधीं हलक्या वस्तूच्या टोपलींत खालीं दगड भरून ठेवायचे व पुन्हा सामान असेल तसें रचून ठेवायचें इ. उद्योग त्यांचे चालत व मग झाडावर बसून त्यांची कशी फजिती होते ती बघायची आणि फिदिफिदी हसत सुटायचें.

झाडाखालीं बसलेल्या गाई, म्हशींना उगीचच उठवायचें. त्यांच्या शिंगांत कधीं फाटकें टोपलें तर कधीं कुजलेले गोणपाट घालून तीं धावूं लागलीं किंवा नाचूं लागलीं कीं मग खो खो करून हसायचें.

आज अशींच मुलें मधल्या सुटींत झाडाखालीं बसलीं होतीं. घारू नांदुकीच्या झाडावर चढून गप्पा मारीत होता. तोंच त्याला बेलदाराचीं गाढवें दूर गुरभाटांत चरत असलेलीं दिसलीं. त्यानें राम, गौरू, जौरूला चटकन् झाडावर चढण्यास सांगितलें. सगळी वानरसेना चटकन् झाडावर चढली. घारूनें गाढवांच्या दिशेला बोट करून म्हटलें, "तीं बघा गाढवं, आपण त्यांना धरूं या व त्यांच्यावर बसूं या. आणि एकाच्या शेपटीला डबा पण बांधूं या!"

सर्वांनीं संमति दिली. गाढवें पाहून त्यांना खूप खूप आनंद झाला. एकानें डबा आणला. एकानें दोरी आणली आणि सारे गाढवांच्या दिशेला चालूं लागले.

"अरे, पण शाळेची घंटा होईल ना इकडे!" केरू म्हणाला.

घारू मारुतीच्या देवळाची सावली दाखवत म्हणाला—"अरे, अजून पुष्कळ वेळ आहे शाळा सुरू व्हायला!"

शाळा सुटण्याचें, भरण्याचें घड्याळ म्हणजे सावली. त्याकडे पाहून घारूनें सांगितलें.

बेलदारांचीं गाढवें चांगलीं पटाईत असतात. त्यांना प्रत्येक गांवांतील अशा वात्रट मुलांशीं दोन हात करण्याची संवय झालेली असते. त्यांच्या शेपटांना लोंबत असणाऱ्या तुटक्या दोऱ्यांवरून आणि पडलेल्या कर-कोच्यांवरून हें आपणांस सहज समजेल.

मुलांचें टोळकें आपल्याच दिशेनें येतांना गाढवांनीं पाहिलें. लगेच त्यांनीं आपल्या चरण्याची दिशा बदलली. येणाऱ्या पोरांकडे आपल्या दुगाण्या करून तीं आतां चरूं लागलीं.

गाढवांच्या दुगाण्यांपासून दोन पावलें दूर असावें म्हणून त्यांच्या शेपट्या धरण्याचें धाडस कोणी करीत नाहींत. आतां राहिले कान! पण ते धरावयास कोणी पुढें आलेच तर तें चटकन त्याच्याकडे पाठ करून उभें राहील. पोरांचें तसेंच झालें. त्यांनीं त्यांचे लांब कान धरण्याचा प्रयत्न केला. पण कान धरायला गेलें कीं त्यांनीं त्यांच्याकडे पाठ केलीच म्हणून समजा!

कान धरूं देत नाहीं असें पाहून त्यांनीं त्यांना हातांतील काठ्यांनीं धोपटण्यास सुरवात केली. तेव्हां त्यांनीं चौखूर उधळून पळण्यास सुरवात केली. आतां यांना पकडावें कसें ? हा प्रश्न सर्वांच्या पुढें होता.

गाढवें पुढें आणि वानर सेना मागें. खेड्यांतील मुलेंहि पळण्यांत पटाईत असतात. तुम्ही त्यांच्याबरोबर पळूं शकणार नाहीं.

शेवटीं घारूनें सगळ्यांना ओरडून सांगितलें कीं, डाव्या हाताला आपण त्यांना अमुक शेतांत नेऊं या. कारण त्य शेताच्या तीनहि बाजूंनीं पेरकुटाची वय होती. त्यांनीं त्यांना नेमकें त्या शेतांत नेलें व आपण हातांची साखळी करून चौथी बाजू आडवून धरली. आतां गाढवांचा नाइलाज झाला. गाढवें फसलीं, हें त्यांच्या फुऽऽर्, फुऽऽऽर् करण्यानें कुणाच्याहि सहज लक्षांत आलें असतें.

मग एकेक साखळी सोडून आंत गेले. त्यांनीं कसे बसे एकेकाचे कान पकडले. घारूनें एक, रामनें एक, गौऱ्यानें एक, बाबूनें एक. गौऱ्यानें पकडलेल्या गाढवाच्या पाठीमागून केरूनें हळूच जाऊन त्याच्या शेपटाला डबा बांधला. नथूनें जवळच असलेल्या निरगुडीच्या झाडाच्या शिपट्या मोडून एकेकाला दिल्या. मग घारूनें सगळ्यांना गाढवावर बसायला सांगितलें. दोनचार मुलें सर्वांच्या मागें गेलीं आणि त्यांनीं गाढवांच्या मागच्या बाजूला सपासप शिपट्या ओढायला सुरवात केली. डब्याचा खाड्खाड् आवाज होऊं लागला. त्यासरशीं गाढवें चौखूर उधळलीं. वरचा स्वार पडावा म्हणून आणि पाठीमागच्या शिपट्यांचा मार कमी व्हावा म्हणून त्यांनीं दुगाण्या झाडण्यास सुरवात केली. त्या बरोबर ज्यांनीं घट्ट धरलें नव्हतें ते गाढवाच्या तोंडाच्या बाजूला उलटे सुलटे होऊन धपाधप् खालीं आले. कुणी काट्यांत पडले, कुणी कातळावर आपटले, कुणी गाढवांच्या पायाखालीं तुडवले गेले.

घारू व राम आडवे होऊन गाढवाच्या गळ्याला घट्ट धरून बसल्यानें अजूनपर्यंत टिकून होते. आपले भाऊबंद मोकळे झाले पण आपली सुटका होत नाहीं असें पाहून त्या दोन गाढवांनीं एक वेगळीच युक्ति शोधून काढली. तीं दोन गाढवें अगदीं वयीजवळून जाऊं लागलीं. पाठीमागच्या कांहीं मुलांनीं त्यांना बाजूला हाकलण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ !

सगळी वय पेरकुटाची होती. कांहीं ठिकाणीं घाणेरी व बोरीचीं झुडपें



होतीं. घारूचे व रामचे सदरे काट्यांना अडकून टर् टर् फाटले. त्यांचें सारें अंग सोलून निघालें. ते दोघेहि मोठमोठयाने ओरडूं लागले. गाढवें जोरानें पळत होतीं. काटे लागूं नयेत म्हणून त्यांनीं हातांनीं काटे दूर करण्यास सुरवात केली. हात सुटायला आणि गाढवांनीं दुगाण्या झाडायला एक गांठ पडली. आणि ते दोघे धाप्‌दिशी खालीं पडले.

इतर गाढवें या दोन गाढवांपासून जरा दूर गेलीं होतीं. या दोघांनीं आँ ऽऽऽकू, आँ ऽऽऽऽकूं करून आपली सुटका झाल्याचें जोरानें ओरडून आपल्या जातभाईंस सांगितलें.

इकडे शाळेची घंटा झाली. ज्या मुलांना घरून निघण्यास उशीर झाला, त्यांनीं घंटा ऐकली. तीं धांवतच शाळेंत गेलीं.

"कायरे, आज एवढींच मुलें!". गुरुजी आलेल्या मुलांकडे पहात म्हणाले.

"गुरुजी, घारू, राम, बाबू सगळीं सगळीं मुलें गुरभाटांत गाढवं पकडायला गेलीं आहेत!" शिरपानें धरलेलें गाढव केरूनें धरलें व तोच त्यावर बसला. स्वतःला बसायला मिळालें नाहीं म्हणून शिरपाला राग आला म्हणून गुरुजींना त्यानें सांगितलें.

इतक्यांत घारू, राम, बाबू सारे हळूंच आले आणि शाळेच्या दरवाजापाशीं उभे राहिले.

" या, आंत या, कुठं गेला होतात एवढ्या उन्हाचे ! गाढवं धरायला हीच वेळ होती का ! आणि हें रे काय घारू, रामू, तुमचे सदरे इतके कसे फाटले ? आतां तुमचीं घरचीं माणसं काय म्हणतील ? " गुरुजी रागानें म्हणत होते.

कोणी कांहींच बोलेना ! सगळीं मुलें खालीं मान घालून उभीं होतीं.

" गुरुजी, मी सांगूं कां सगळं ? " शिरपाचा झालेला अपमान त्याच्या मनांत डांचत होता, तो उभा रहात म्हणाला.

" हं, सांग काय काय केलं यांनीं ! " गुरुजी त्याच्या अंगावर खेकसत म्हणाले.

शिरपानें सारी हकीकत तिखटमीठ लावून सांगितली.

सर्व विद्यार्थ्यांकडे पहात गुरुजी म्हणाले, " जा हातपाय धुवा, तोंड धुवा. घारू, राम फाटलेले सदरे बदला, खरचटल्या ठिकाणीं तेल लावा आणि मग या शाळेंत. त्या बिचाऱ्या गाढवांच्या शेपट्यांना डबे बांधतां काय ! थांबा, उद्यां तुमच्या साऱ्यांच्या शेंड्यांना मी पण डबे बांधतों म्हणजे समजेल काय त्रास होतो तो ! जा निघा येथून ! "

* * *

## १७. घारूनें शेंड्या कापल्या

घरीं गेल्यावर घारूची त्याच्या आजींनीं आजच्या प्रकाराबद्दल खूपच हजेरी घेतली. परवाचा म्हणायला रोजच्याप्रमाणें सारी वानरसेना घारूच्या अंगणांत जमली. त्यांना पाहून आत्या म्हणाल्या—

" बाबुल्यांनो, आज चांगलाच उद्योग केलात तुम्ही बाबांनो ! अरे, गाढवाची लाथ फार वाईट. थोबाडावर तडाखा बसला असतां तर डोळे फुटले असते. चांगले परमेश्वरानें सुंदर डोळे दिले आहेत तुम्हाला. असं करूं नका. जरा जोरांत अभ्यास करा. उद्यांपासून मधल्या सुटींत लौकर लौकर येऊं नका. साऱ्या गांवाला घंटा ऐकूं येते शाळेची. घंटा झाल्यावर घरनं निघत जा उद्यापासून ! " आत्यांनीं सर्वांना समजावून सांगितलें.

परवाचा झाली. सगळीं मुलें आपापल्या घरीं जेवायला गेलीं.

हल्लीं पोरें उन्हाळा असल्यानें जेवणें झाल्यावर रात्रीं झोपायला मारुतीच्या देवळांत जायचीं. घारू पण देवळांतच झोपायला जायचा.

आज दुपारीं गाढवें पकडतांना कुणाच्या पायांत काटे मोडले होते, कुणी ठेचाळलें होतें, कुणाला गाढवानें तुडवलें होतें. रामचें व घारूचें अंग तर सारें ओसकटून निघालें होतें. म्हणून आज त्यांची हालचाल थोडीशी थंडावल्यासारखी वाटत होती.

इतक्यांत तेथें शिरपा आला. त्याला पाहून सारीं पोरें म्हणालीं, "दुपारीं तूंच आमचं नांव गुरुजींना सांगितलंस ना! द्या रे याला हांकलून. आपल्यांत घेऊं नका!" केरू सर्वांकडे पहात म्हणाला.

एकाद्या मुलाला वाळींत टाकलें तर किती कोंडमारा होतो याचा अनुभव शिरपाला यापूर्वी चांगलाच आला होता. तो गरीब होता. त्याची घरशिवणीहि आतां जवळच आली होती, म्हणून त्याला मुलांची फार फार जरूरी होती. मुलांनीं त्याला दटावतांच तो रडूं लागला. मी आतां असें पुन्हा करणार नाहीं असें तो रडत रडत म्हणाला.

"तुझ्या शेतांत 'पोपटी' करायची कबुली देत असलास तर घेऊं आमच्यांत. नाहींतर टाकूं वाळींत तुला!" रामनें दरडावून त्याला म्हटलें.

शेवटीं पोपटी करायची कबुली देऊन तो इतर पोरांत मिसळला.

गप्पा मारतां मारतां एकेकाला झोपेनें माळ घातली.

"थांबा, उद्यां तुमच्या शेंड्यांना डबे बांधतों!" हें गुरुजींचें वाक्य घारूच्या डोक्यांत सारखें घोळत होतें. तो ह्या कुशीचा त्या कुशीवर वळला. त्याला झोप कांहीं केल्या येईना.

आपण जसे केस ठेवून भांग पाडतो तशी केस ठेवण्याची चाल कांहीं खेड्यांतून नाहीं. ठराविक वेळीं न्हावी यायचा आणि त्याच्यापुढें बसून लहानापासून मोठ्यापर्यंत चम्मन करायचा. पाठीमागच्या बाजूला मोठा थोरला घेरा व त्याच्या मधोमध लांबलचक शेंडी लोंबत असायची.

शहरांतील कांहीं कटिंग केलेलीं मुलें पाहून तींहि आपल्या बाबांना म्हणायचीं, "बाबा, मी हजामत करणार नाहीं जा!" पण ते त्यांकडे लक्षच द्यायचे नाहींत. ठराविक वार आला कीं न्हावीदादा यायचे आणि सर्वांची तुळतुळीत करून जायचे!


केस राखण्याबद्दल घारूनें आपल्या बाबांजवळ पुष्कळ वेळां असाच हट्ट धरला होता. पण तो न्हाव्याच्या वारापर्यंतच टिकायचा. न्हावीदादा यायचे आणि चम्मन करून जायचे !

आपण आतां शेंडीच कापून टाकावी. म्हणजे मग बाबा आपोआपच कटिंग करायला परवानगी देतील. शिवाय शेंडीच नसली म्हणजे मग उद्यां गुरुजी आपल्या शेंडीला डबा कसा बांधतील ?

पण हें झालें आपल्या पुरतें. आणि आपल्या मित्रांच्या शेंड्यांना गुरुजींनीं डबा बांधला तर तेंहि आपणास पहावणार नाहीं. तेव्हां आपल्या-बरोबर त्यांच्याहि शेंड्या कापून टाकाव्यात. त्यानें त्यांच्याकडे पाहिलें. त्याना आतां झोपा लागल्या होत्या. तो झटकन् उठला आणि घरीं गेला.

त्याच्या आत्या, आई, आजी नुकतेंच काम आटोपून अंथरुणावर पडल्या पडल्या गप्पा मारीत होत्या. घारू आला आणि हळूंच इकडे तिकडे कांहींतरी शोधूं लागला. घारूला लुडबुड करतांना आत्यांनीं पाहिलें. तो कात्री शोधीत होता. त्याला पाहून त्याच्या आत्या म्हणाल्या —

“ घारू, कांहीं उपद्व्याप करूं नकोस हं ! तूं अजून निजला नाहींस. एवढ्या रात्रीं तुला काय हवें आहे ? लौकर जाऊन नीज. नाहींतर देवळांत निजायला तुला परवानगी मिळणार नाहीं ! ”



शोधतां शोधतां घारूच्या हाताला कातर लागली. ती हळूच खिशांत घालीत तो म्हणाला—" कांहीं नाहीं, जरा बिब्बा शोधतोय, रामाला ठेच लागलीय त्यावर घालायला. " असें म्हणत त्यानें पळ काढला.

सर्वांना गाढ झोपा लागल्या होत्या. तो हळून प्रत्येकाच्या जवळ गेला. आणि एकेकाची शेंडी तो हळू हळू कापूं लागला.

सर्वांच्या शेंड्या कापून झाल्यावर त्यानें आपली शेंडी पण कापून टाकली. सगळ्यांच्या शेंड्या त्यानें एका कागदांत बांधून तो कागद एका दगडाखालीं पुरून टाकला. आपली कातर त्यानें देवळाच्या कौलांत लपवून ठेवली.

" गुरुजी, शेंड्याच नाहींत तर आतां तुम्ही उद्यां शेंड्यांना डबे कसे बांधणार ? " असें तो पुटपुटला.

प्रत्येकाची शेंडी कापतांना त्याला हसूं येत होतें, तें त्यानें कसेंतरी आवरून धरलें. पण वरील वाक्य पुटपुटल्यावर त्याला हसें अगदीं आवरेना ! त्यानें आपला हात तोंडावर अगदीं दाबून धरला. आणि तो आडवा झाला. थोड्याच वेळांत त्यानें निद्राख्यानाला सुरवात केली.

* * *

## १८. शेंड्या चोर सांपडला !

दुसऱ्या दिवशीं शाळेची घंटा झाली. प्रार्थनेला मुलें जमलीं. घारूहि आपणाला कांहीं एक माहीत नाहीं असा भाव तोंडावर दाखवीत प्रार्थनेला उभा राहिला. आज देवाच्या प्रार्थनेकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें. आपल्या शेंड्या कापल्या आहेत हें कांहींच्या लक्षांत आलें. तर कांहींना कळलेंच नाहीं. ज्यांना शेंडी कापल्याचें कळलें होतें त्यांनीं एकमेकास खुणविण्यास सुरवात केली.

एकमेकाला खूण करायची आणि फिदिफिदी हसायचें असें चाललं होतें. घारू मात्र आपणास कांहींएक माहीत नाहीं असें भासवीत होता. इतक्यांत घारूला एकानें खूण केली. लगेच घारूनें टोपी काढून पाहिलें आणि तोंडावर आश्चर्य दाखवीत त्यानें हातानें कोणी ? म्हणून त्याला खूण

केली. त्यानेंहि आपला हात हलवीत मला माहीत नाहीं असें खुणेनें सांगितलें. मग घारू व तोहि फिदिफिदी हसूं लागले.

नेहमींसारखा प्रार्थनेचा सूर लागला नसल्याचें गुरुजींच्या लक्षांत आलें. त्यांनीं बारकाईनें मुलांकडे पहाण्यास सुरवात केली.

जो तो डोक्यांकडे बोट दाखवून नंतर मूठ मिटून अंगठा हलवीत असल्याचें गुरुजींच्या लक्षांत आलें. आंगठा हालवीत हालवीत जो तो फिदिफिदी हसत आहे हें गुरुजींनीं पाहिलें.

प्रार्थनेच्या वेळीं विद्यार्थी हसत आहेत त्यांचें लक्ष प्रार्थनेकडे मुळींच नाहीं म्हणून गुरुजींस पुष्कळ राग आला. पण प्रार्थना संपेपर्यंत ते कांहींच बोलले नाहींत.

प्रार्थना आटोपून मुलें शाळेंत गेल्यावर त्यांनीं प्रार्थनेच्या वेळीं चाललेल्या प्रकाराबद्दल एकदम रागानें विचारलें—" मघाशीं तुम्हाला हसायला काय झालें होतें सांगा ! "

कोणींच कांहीं बोलत नाहीं असें पाहून गुरुजींनीं वरील प्रश्न पुन्हां एकदां केला.

तरीहि मुलांकडून उत्तर आलें नाहीं.

गुरुजींनीं आवाज चढवीत पुन्हा तोच प्रश्न विचारला आणि वर बजावलें कीं, जर सांगितलें नाहींत तर एकेकाला बडवून काढीन ! "

तरीहि कोणी कांहीं बोलत नाहीं असें पाहून गुरुजी घारूकडे वळले आणि—" घारू मघाशीं तुम्ही सारे कां हंसत होतात ? " म्हणून प्रश्न विचारला.

आतांपर्यंत प्रश्न वैयक्तिक नसल्यानें आपण बोललों नाहीं तरी चालेल, पण आतां मलाच विचारलें तेव्हां कांहींतरी सांगितलेंच पाहिजे असें त्याला वाटलें. पण त्याला अजूनहि हसूं आवरत नसल्यानें—

डोक्याकडे बोट, मूठ वळून घारूनें आंगठा हालवला मात्र !

अडवून धरलेल्या पाण्याचा बांध फुटला तर पाणी खो खो करीत एकदम जोरानें वाहूं लागतें त्याप्रमाणें हास्याच्या मोठ्या साठ्याचा बंधारा एकदम फुटला आणि सारी शाळा खो, खो, खो करून हंसूं लागली.

गुरुजींना खुणेचा अर्थ न कळल्यानें ते बुचकळ्यांत पडले. मुलांकडे पाहून त्यांनाहि हसूं येत होतें पण तें त्यांनीं आवरलें.

त्यांत कांहीं मुलें रात्रीं देवळांत निजायला आलीं नव्हतीं अशीं कांहीं मुलें होतीं. त्यांपैकीं एक मुलगा धांवत गुरुजींजवळ गेला आणि त्यानें रात्रीं कुणीतरी शेंड्या कापल्याचें त्यांना सांगितलें.

ती हकीकत ऐकून गुरुजींचा राग कोठच्या कोठें पळाला व तेहि पोट धरधरून हसूं लागले. त्यांना हसतांना पाहून मुलेंहि जोरजोरानें पुन्हा हसूं लागलीं.

हास्याच्या उकळ्या जरा कमी झाल्यावर गुरुजींनीं पुन्हा रौद्र अवतार धारण करून आपला निश्चय मुलांना पुढीलप्रमाणें त्यांनीं सांगितला.


" शेंड्या कोणी कापल्या तें मला सांगा. त्याचें नांव कळल्याशिवाय मी तुम्हाला शिकवणार नाहीं ! "

आतां मात्र सारीं मुलें गप्प झालीं.

" गुरुजी, आम्हाला खरच माहीत नाहीं. " राम उभें रहात म्हणाला.

" तुमच्याशिवाय शेंड्या कोण कापणार ? ज्यांनीं कुणीं शेंड्या कापल्या असतील त्यांनीं आपण होऊन आपलें नांव सांगितलें तर मी त्यास क्षमा करीन. "

घारू खोडकर होता पण फारच हळवा होता. आतां त्याला आपण



केलें तें वाईट केलें असें वाटूं लागलें. त्याची चुळबुळ सुरू झाली आणि आतां सांगितलें तरी शिक्षा होणार नव्हती

शेवटीं तो उभा राहिला. " गुरुजी, शेंड्या मी कापल्या. मला क्षमा करा. " हें वाक्य त्यानें हळूच म्हटलें आणि तो खालीं बसला.

घारूनें असें कां केलें हें अजूनहि गुरुजींच्या लक्षांत आलें नाहीं.

" घारू, पण मध्येंच तुला शेंड्या कापण्याची लहर कशी काय आली बुवा तें मला कळत नाहीं ! " गुरुजी घारूकडे पहात म्हणाले.

" थांबा, तुमच्या शेंड्यांना मी उद्या डबे बांधतो असें म्हणालात ना तुम्ही, म्हणून मी सर्वांच्या शेंड्या कापल्या ! " घारूनें खुलासा केला.

" अरे वेड्या, असें मी जरी काल रागानें म्हणालों तरी पण खरंच का तुमच्या शेंड्यांना मी डबे बांधणार होतों ! " गुरुजी हसत म्हणाले.

शाळा सुटली. मुलें बाहेर पडलीं आणि म्हणाली " शेंड्या चोर सापडला रे सापडला ! "

IRBK-0107159

## १९. छोटा मांत्रिक

" घाऽऽरूऽऽ, ए घाऽऽरूऽऽ, " भित्रा घारूच्या घराजवळ वईच्या आड उभा राहून हळू हळू हाका मारीत होता.

तो थोडा वेळ थांबला. घारूची कांहींच हालचाल त्याला दिसेना ! मग तो हळूच मागील दाराच्या वईजवळ गेला. आतां त्यानें शीळ घालायला सुरवात केली. शिळेचें उत्तर शिळेनें मिळालें. त्याचा अर्थ होत होता थोडा वेळ थांब म्हणून. तो थोडा वेळ थांबला.

" काय रे भित्रा ! " घारू त्याच्यापुढें उभा रहात म्हणाला.

" माझ्याबरोबर चल कीं रे जरा ! " भित्रा काकुळतीनें म्हणाला.

" एवढया उन्हाचं ! कुठं जायचं ? " घारूनें आपली शंका विचारली.

" अरे, माझी आई म्हणाली कीं, जरा वाळलेलीं लाकडें घेऊन ये म्हणून. चल कीं माझ्याबरोबर ! मला एकट्याला जायला भीति वाटते. '

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय [illegible]
दा. क्र. ७७५९
IRBK-0107159
IRBK-0107159

ठा.ग्र. - ७१५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

...ना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत ... न करणे.

एकमेकांना कधींहि पाहिलें नव्हतें. त्यांची दृष्टादृष्ट झाली. ते पवित्र्यांना उभे राहिले. त्यांनीं माना खालीं घातल्या. ते हळूंहळूं पुढें सरकूं लागले.

घारू–रामला वाटलें आतां चांगलीच जुंपणार! तेहि आपआपल्या खोंडामागोमाग एकेक पाऊल पुढें पुढें सरकत होते.

रामच्या मनांत आलें. आपल्या रूपानें जर त्याला हरवलें तर सुंदर माणिमाळ आपल्या रूपाला मिळेल.

सोना–रूपांचें डोक्याला डोकें भिडलें. एक मिनिटांतच दोघांनीं आपआपलें डोकें वर केलें व ते एकमेकांना हुंगूं लागले. मोठ्या प्रेमानें सोनानें आपल्या जिभेनें रूपाचा कान खाजवला. नंतर रूपानें सोनाचा कान खाजवला. कान खाजवतां खाजवतां एकमेकांनीं एकमेकांच्या कानांत काय सांगितलें कुणास ठाऊक! बहुतेक, आपले बालमालक एकमेकांचे दोस्त आहेत. मग आपणहि एकमेकांचे दोस्त नाहीं कां? मग आपली लढत कशी होणार? आपण जर लढत लढलों तर राम–घारूचें कायमचें वैर येणार! म्हणून त्यांनीं लढत करण्याचें नाकारलें असलें पाहिजे.

दोघांनीं आपल्या शेपट्या वर केल्या. इतक्या लांबवर ते आजवर


IRBK-0107159

कधींच आले नव्हते. त्यांना खूप खूप आनंद झाला. ते आपल्या बालमालकांच्या भोंवतीं भोंवतीं हुंदडूं लागले. मधूनच ते हंऽऽबें, हंऽबें ऽऽ,

असें ओरडत. बाल मालकांची आपण कशी जिरवली असेंच त्यांना म्हणावयाचें असेल असें वाटतें! कीं, एकमेकांना मित्र भेटले म्हणून त्यांना आनंद झाला असेल काय कोणास ठाऊक!

हातांतल्या दोऱ्या आवरून धरत घारू–राम प्रत्येकाचें नांव घेऊन चुचकारीत होते. घारू–राम बोलत बोलत घराकडे निघाले. बोलतां बोलतां घारूनें आपल्या हातांतील दोरी सहजच कमरेला बांधली. सोना–रूपा बालमालकांच्या भोंवतीं उड्या मारीत रिंगण घालत घालत हळूहळू पुढें जात होते. इतक्यांत समोरून एक आलें कुत्रें. त्यांच्या उड्या पाहून तें घाबरलें व लागलें त्यांच्या अंगावर भुंकायला!

कुत्रें भुंकतांच सोना–रूपा घाबरले. ते उधळले व जोरांत पळूं लागले. राम–घारूहि त्यांच्याबरोबर पळूं लागले. पळून पळून ते दमले. आतां यांना त्यांच्याबरोबर पळवेना. रामच्या हातांतून दोरी सुटली. घारूच्या कमरेची दोरी सुटेना व त्याला सोनाबरोबर आतां पळवेना!

इतक्यांत एका दगडाला ठेचाळून घारू धाडकन् पडला. त्याला उठतां येईना. सोना थांबेना. घारूला ओढीत तो तसाच पुढें जात होता. त्याचें सारें अंग खरचटून निघालें. त्यानें " सोना हो ऽऽ, हो ऽऽऽ! " करून पाहिलें पण सोना कुठचा ऐकायला बसलाय?

शेवटीं घारूला एक युक्ति सुचली. त्याला पक्षी प्राण्यांचे हुबेहुब आवाज काढायला येत होते. त्याच्या मनांत आलें आपण सोनीसारखें ओरडावें म्हणजे सोना थांबेल!

हंबा ऽऽऽ, हंबा ऽऽऽ, असें तो सोनीसारखें अगदीं हुबेहूब ओरडला. आवाज मागून येत असल्यानें सोना एकदम थांबला. त्यानें आपले कान टवकारले. तो आवाजाचा कानोसा घेऊं लागला.

ही संधि साधून घारू चटकन् उठला. त्यानें गांठ सोडायचा प्रयत्न चालविला. इतक्यांत त्याच्या मदतीला राम आला. दोघांनीं खूप जोर करून गांठ सोडविली. सोना मोकळा झाला.

रामला सोनाचा राग आला. त्यानें आपल्या हातांतील शिपटी त्याच्या पायावर सप्‌दिशी ओढली. शिपटी बसतांच तो उधळला. रूपा त्याची वाट बघत पुढें उभा होताच. सोना त्याच्याजवळ पोहोंचला. मोकळेपणाचा आनंद त्यांना यापूर्वीं कधींच मिळाला नव्हता. दोघांनीं आपल्या

शेपट्या वर केल्या व मनसोक्त उड्या मारण्यास सुरवात केली.

" घारू, सोना कसा रे थांबला ? " रामनें आश्चर्यानें विचारलें.

" अरे, युक्ति सुचली मला ! नाहीं तर आज माझ्या अंगाशीं पैज आली असती ! " घारू सुस्कारा सोडीत म्हणाला.

" कोणती युक्ति ? मला तरी सांग ! " रामनें विचारलें.

" तो थांबेना तेव्हां मी अगदीं सोनीसारखें ओरडण्यास सुरवात केली. याबरोबर सोना थांबला ! " घारूनें आपली युक्ति सांगितली.

" छानच युक्ति आहे बोवा तुझी ! " राम म्हणाला.

बोलत बोलत ते गांवाकडे निघाले. तें पहा दूर उंचावर दिसतें ना ? तें घारूचें गांव. त्या गांवाचें नांव मल्याण.

* * *

## २. घारूचें जन्मगांव

अलिबाग तालुक्यांतील समुद्रकिनारींचीं अष्टागरें सृष्टिसौंदर्यानें नटलेलीं आहेत. येथील नारळी सुपारींच्या बागा पाहून मन अगदीं प्रसन्न होतें. या अष्टागरांना सोडून आपण किनाऱ्यापासून दूर दूर जाऊं लागलों कीं आपणांस जिकडे तिकडे भातशेतीच दिसून येईल. थोड्या थोडया अंतरावर लहान लहान खेडीं व त्यांच्या अवतींभोंवतीं भातशेती.

किनाऱ्यापासून तीन कोसांवर एक लहानसें खेडें आहे. त्याचें नांव 'मल्याण'. या गांवांत घारूचा जन्म झाला. या गांवच्या एकाद्या गांवकऱ्यास तुम्ही विचारलेत कीं, कसें आहे तुमचें गांव ?—

" मल्याण नगरी आणि भोंवताली दगडी. " अशा म्हणवजा वाक्यानें तो आपल्या गांवचें झटकन वर्णन करील. असें जरी त्यानें आपल्या गांवचें वर्णन केलें तरी या गांवची प्रसिद्धी अगदींच नाहीं असें नाहीं.

गांवकऱ्यानें वर्णन केल्याप्रमाणें या गांवाच्या आसपास खरोखरच काळेकुळकुळीत दगड जिकडे तिकडे पहावयाला मिळतील. त्यांना पाहून मनांत पुष्कळदां येतें कीं, इतके दगड, लहान मोठे या गांवाच्या आजूबाजूला कोठून व कसे आले असतील ? गांवचें रक्षण करणाऱ्या सैनिकांचे कोणा